७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
शनिवार, दि. १६ मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# अधिकाऱ्यांनी लोकभिमुख प्रशासनाचे मॉडेल उभारावे

**मुंबई (दै. संध्या)**

महसूल विभागाने लोकाभिमुख होऊन काम करणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने शासकीय पदाचा लोकोपयोगी कामांसाठी उपयोग करुन गतिमान आणि पारदर्शक कामांचे नाविन्यपूर्ण मॉडेल सादर करावे, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाच्या कामाचा सर्वसमावेशक आढावा घेतला. कौशल्यविकास मंत्री तथा जिल्ह्याचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.




**मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, महसूल हा नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी निगडित विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण केले जाते. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्थानिक प्रशासनाने वेगवेगळ्या भागात पूर्वनियोजन करून स्वतःहून गेले पाहिजे. इज ऑफ डूईंगच्या अत्यावश्यक सेवा तातडीने दिल्या गेल्या पाहिजेत, तसेच त्यांच्याकडे आलेल्या प्रकरणांचा निपटारा देखील तातडीने झाला पाहिजे. स्थानिक समस्या त्याच पातळीवर सोडविल्या गेल्या पाहिजेत असे सांगून शासनापर्यंत येणाऱ्या तक्रारींची संख्या कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रशासनात नाविन्यपूर्ण आणि चांगले काम करणाऱ्यांचे कौतुकच होईल असे सांगून शासनामार्फत जिल्हा प्रशासनाच्या सर्व समस्या सोडविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. कोणत्याही कारणास्तव शासनाच्या जमिनींवर अटी शर्तींचा भंग होत असल्यास त्यावर कारवाई करुन जमीन शासन जमा करावी, असे निर्देशही मंत्री बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचे सादरीकरण करुन माहिती दिली.

यासह नोंदणी विभाग, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, मुद्रांक जिल्हाधिकारी आदी विभागांच्या कामांचा मंत्री बावनकुळे यांनी यावेळी आढावा घेतला. प्रलंबित कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

## मनोज जरांगेंचा पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा

**जालना (दै. संध्या)**

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुंबईच्या आंदोलनावेळी मराठा आरक्षणाचा सातारा गॅझेटचा जीआर एका महिन्यात काढतो असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्यावर आठ महीने झाले तरी काहीही कारवाई करण्यात आली नाही. मराठा आंदोलकांवरील गुन्हेही मागे घेतले गेले नाहीत, अशा शब्दात जरांगे यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

मनोज जरांगे जालन्यात बोलताना म्हणाले, ज्यांना कुणबी पुरावा सापडला त्यांना व्हॅलिडिटी दिली जात नाही. शिंदे समिती रेकॉर्ड शोधत नाही. देवेंद्र फडणवीसांनी मराठ्यांचे वाटोळे केले, अशी टीका जरांगे यांनी केली आहे. त्यामुळे आता मराठा आरक्षणाच्या मागणीवरून पुन्हा एकदा आंदोलनाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. जरांगे पुढे बोलताना म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मराठा समाजाला जास्तीत जास्त त्रास देण्याचे काम सुरू आहे. मते आणि नेते मराठ्यांची लागतात, पण



■ ८ महिने उलटूनही सातारा गॅझेटचा जीआर न निघाल्याने संताप, मुख्यमंत्र्यांवरही टीका

मराठा समाजातील मुले मोठी होऊ नयेत, अशी भूमिका दिसते, अशीही टीका त्यांनी केली आहे. मुंबई आंदोलनानंतर हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाला त्यावेळी सरकारचे कौतुक केले होते. त्यानंतर 108 प्रमाणपत्रांचे वितरण झाले. मात्र सातारा संस्थानाच्या गॅझेटबाबत दिलेले आश्वासन अजूनही पूर्ण झालेले नाही. आता आम्हीच पाहतो हा जीआर कसा निघत नाही, असा थेट इशाराच जरांगे यांनी दिला आहे. तसेच कुणबी नोंदी सापडूनही संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेक मराठा कुटुंबे अडचणीत आहेत.

## पुढील वर्षापासून NEET परीक्षा ऑनलाईन; OMR शीटला ब्रेक, केंद्राचा निर्णय

**मुंबई (दै. संध्या)**

NEET UG परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी जाहीर केले की, पुढील शैक्षणिक वर्षापासून NEET UG परीक्षा OMR शीटवर न होता पूर्णपणे कॉम्प्युटर-आधारित पद्धतीने घेतली जाईल. परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत बोलताना धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, "पुढील वर्षापासून NEET परीक्षेची मूळ समस्या सोडवली जाईल. OMR शीटऐवजी परीक्षा ऑनलाइन घेतली जाईल." पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागल्यानंतर सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यासोबतच, NEET UG 2026 ची फेरपरीक्षा 21 जून रोजी होणार असल्याची घोषणा करण्यात आली. या परीक्षेसाठी प्रवेशपत्र (Admit Card) 14 जूनपर्यंत जारी केले जाणार आहेत. सरकारचा गैरप्रकारांबाबतचा दृष्टिकोन 'झिरो टॉलरन्स'च राहणार



असल्याचेही प्रधान यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, "परीक्षा माफिया आणि समाजविघातक घटकांविरोधातील ही दीर्घ लढाई आहे. तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन आव्हाने समोर येत आहेत. सोशल मीडियावर दिशाभूल करणारी माहिती पसरवून विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही जण फेरपरीक्षा प्रक्रियेलाही आव्हान देण्याचा प्रयत्न करत आहेत." "परीक्षेची विश्वासार्हता धोक्यात आल्याचे स्पष्ट झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड होऊ शकत नाही, म्हणूनच परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला," असे ते म्हणाले. सरकारने 12 मे रोजी परीक्षा रद्द केली होती.

# शेट्टींसह राऊत, सपकाळ, जानकरांची पोलिसांकडून धरपकड

## राजू शेट्टींनी सरकारला घेरले : आंबा-काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून आक्रमक



**मुंबई (दै. संध्या)**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. राज्य सरकार नियम आणि कायदे पायदळी तुडवत सत्ता चालवत असेल, तर शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या न्यायासाठी सविनय कायदेभंग केला तर त्यात चुकीचे काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार गंभीरपणे लक्ष देत नसल्याचा आरोप करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. या वेळी मोर्चाचे नेतृत्त्व करणाऱ्या राजू शेट्टी, विनायक राऊत, महादेव जानकर, हर्षवर्धन सपकाळ यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. वर्षा बंगल्याकडे जाण्याच्या मार्गावर मोर्चा सुरु होण्याच्या आधीच सर्व आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांच्या वर्षा बंगल्यावर हा मोर्चा जाणार होता. मात्र, गिरगाव चौपाटी परिसरातच पोलिसांनी सर्व आंदोलकांना ताब्यात घेतले. या मोर्चाला परवानगी देण्यात आलेली नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मोर्चा काढण्यासाठी जमा झालेल्या सर्व शेतकऱ्यांना तसेच नेत्यांनाही पोलिसांनी आधीच ताब्यात घेतले. उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेसने देखील या मोर्चाला पाठिंबा दिला होता. कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मुंबईत आंदोलन करण्यासाठी जमलेल्या या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शेकापचे जयंत पाटील, शिवसेनेचे माजी खासदार विनायक राऊत यांच्यासह अनेक नेत्यांना पोलिसांनी अडवल्यानंतर शेतकरी अधिक आक्रमक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. गिरगाव चौपाटीपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानाकडे मोर्चा नेण्याची तयारी आंदोलकांनी केली होती. मुख्यमंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्या मांडण्याचा प्रयत्न आंदोलकांचा होता. मात्र, पोलिसांनी मोर्चा पुढे जाण्यापूर्वीच आंदोलनकर्त्यांची धरपकड सुरू केली. आंदोलकांनी आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा पर्याय नाकारत थेट वर्षा बंगल्यावर जाण्याचा आग्रह धरला.

**सरकारवर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप**


राजू शेट्टी यांनी पुढे बोलताना सरकारवर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. गेल्या दोन महिन्यांपासून कोकणातील शेतकरी रस्त्यावर उतरून न्याय मागत आहे. मुख्यमंत्री अनेकदा कोकण दौऱ्यावर आले, पण त्यांनी शेतकऱ्यांच्या भावना समजून घेतल्या नाहीत. साधं निवेदन स्वीकारायलाही वेळ दिला नाही, असे ते म्हणाले. कोकणातील शेतकरी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने मुंबईत आला होता, मात्र त्यांच्या वेदनांकडे दुर्लक्ष करून पोलिसी कारवाई करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


**ढिंग-टांग**




## मनोजकुमार शर्मा हे मुंबईचे कायदा व सुव्यवस्था विभागाचे नवे सहपोलीस आयुक्त

# राज्यातील पोलिस खात्यात फेरबदल

### तेजस्वी सातपुतेंना मिळाली बढती : नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्ता कराळे यांचीही बदली

**पुणे (दै. संध्या)**

राज्यातील पोलिस खात्यात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. अनेक बड्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. IPS तेजस्वी सातपुते यांची पुण्याच्या गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तेजस्वी सातपुते सध्या खरात प्रकरणाचा तपास करत आहेत. खरात प्रकरणात स्थापन केलेल्या एसआयटी प्रमुख पदावर सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खरात प्रकरणातील एसआयटीचा तपास सातपुते यांच्याकडेच राहणार असल्याची माहिती मिळत आहे. राज्यातील वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. मुंबईतील वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. मनोजकुमार शर्मा हे मुंबईचे कायदा व सुव्यवस्था विभागाचे नवे सहपोलीस आयुक्त असणार आहेत. तर अनिल कुंभारे मुंबई गुन्हे शाखेचे नवे सहपोलीस आयुक्त असणार आहेत. सुवेझ हक यांची मुंबई पोलिसांच्या प्रशासन विभागाच्या सहपोलीस



आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर मुंबईच्या वाहतूक सहपोलीस आयुक्तपदी सत्यनारायण चौधरी यांची बदली करण्यात आली आहे. त्याचबरोबर राजेश प्रधान मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेचे नवे सहपोलीस आयुक्त असणार आहेत. नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्ता कराळे यांची देखील बदली करण्यात आली आहे. आता प्रवीण पडवळ हे नाशिक परिक्षेत्राचे नवीन विशेष पोलीस महानिरीक्षक असणार आहेत. अशोक खरात प्रकरण आणि इगतपुरी कॉल सेंटरसह 400 कोटींचा कंटेनर दत्ता कराळे चर्चेत आले होते. अशोक खरात सोबत दत्ता कराळे यांचा एका कार्यक्रमातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. अंजली दमानिया यांनीही याबाबतीत आरोप केले होते. दत्ता कराळे यांच्यांसाह राज्यातील इतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बदल्या करण्यात आल्या आहेत. काही दिवसापूर्वी नाशिक ग्रामीण चे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचीही बदली झाली होती. बाळासाहेब पाटील यांच्या पाठोपाठ आता दत्ता कराळे यांचीही बदली करण्यात आली आहे.

राज्याच्या गृह विभागात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्य पोलीस खात्यातील वरिष्ठ स्तरावरच्या अधिकाऱ्यांसह IPS अधिकाऱ्यांच्यादेखील बदली करण्यात आल्या आहेत.




# संपादकीय

## ‘आमच्या शरीरावर आमचा अधिकार!’

गेल्या काही दशकांपासून जागतिक स्तरावर महिलांच्या आरोग्य हक्कांबाबत एक घोषणा अत्यंत प्रभावी ठरली, ती म्हणजे - ‘आमच्या शरीरावर आमचा अधिकार !’ हे केवळ एक वाक्य नसून, स्त्रियांनी संघटितपणे व्यक्त केलेला स्वाभिमान आणि अस्तित्वाचा हुंकार आहे. दीर्घकाळपर्यंत समाजात स्त्रीच्या शरीराकडे केवळ ‘वंश वाढवण्याचे साधन’ या दूषित दृष्टिकोनातून पाहिले गेले. या विचारातूनच स्त्रीच्या शरीरावर पतीची मालकी, परस्त्रीवर आक्रमण करून तिला ‘धडा शिकवण्यासाठी’ बलात्कारासारखी कृत्ये करणे किंवा तिचे स्त्रीत्व ओरबडून घेणे, अशा विकृती समाजात मूळ धरून होत्या. तात्त्विक चर्चांमध्ये स्त्री-पुरुषांच्या भावना एकरूप झाल्या तरच सहजीवन यशस्वी होते, असे म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र परिस्थिती वेगळी होती. स्त्रीच्या भावनांना स्थान न देता, तिला केवळ मूल जन्माला घालणारे यंत्र मानले गेले. मानवी संस्कृती टोळ्यांमधून स्थिर होत गेली तशी विवाह आणि कुटुंब संस्था उदयाला आली. यातूनच वारसा हक्क आणि पितृसत्ताक पद्धती रूढ झाली. यातही मुलाच्या हव्यासापोटी मुलगी झाली तर तो स्त्रीचाच दोष मानला जाऊ लागला. १९६०च्या दशकातल्या संशोधनांनी या विचारांना छेद दिला. आकर्षणाच्या प्रक्रियेत स्त्रीचा विचार आणि ओढ तेवढीच महत्त्वाची आहे, हे समोर आले. स्त्रीचे शरीर ही कोणाच्या मालकीची वस्तू नसून, ती स्वतःच्या जीवनाचे निर्णय घेण्यास सक्षम आहे, हा क्रांतिकारी विचार मांडला गेला.

मासिक पाळी हा आजार नसून ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ती अपवित्र नाही, हा मुद्दा केंद्रस्थानी आला. मातृत्वाची जबाबदारी केवळ स्त्रीची नसून, त्यात पितृत्वाचाही समान वाटा आहे आणि कुटुंब नियोजनाची साधने वापरणे ही स्त्री-पुरुष दोघांचीही जबाबदारी आहे, हे अधोरेखित झाले. १९९५च्या कैरो येथील ‘आंतरराष्ट्रीय लोकसंख्या आणि विकास परिषदे’नंतर (ICPD) महिलांचे आरोग्य म्हणजे केवळ ‘प्रसूती काळ’ नसून, जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर तिची साथ देणे ही शासन आणि आरोग्य संस्थांची जबाबदारी मानली गेली. आजही सर्वात मोठा अडथळा आहे तो आरोग्य व्यवस्थेतील ‘पुरुषप्रधान’ मानसिकतेचा. व्यावसायिक नफ्यासाठी स्त्रियांवर अनावश्यक शस्त्रक्रिया केल्या जातात. गरज नसताना गर्भाशय काढून टाकणे, अवयवांची तस्करी यामागील व्यावसायिक षडयंत्र




तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. ‘माल’, ‘चीज’ अशा स्वरूपाची भाषा वापरून स्त्रियांच्या शरीराचा बाजार मांडणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध आता भूमिका घेण्याची वेळ आली आहे.

‘आमच्या शरीरावर आमचा अधिकार’ या घोषणेचा दुसरा टोकदार पैलू म्हणजे कृत्रिम सौंदर्याचे आकर्षण. प्लॅस्टिक सर्जरी आणि कृत्रिम साधनांच्या वापरामागे अनेकदा व्यावसायिक षडयंत्र असते. याचे विपरीत परिणाम लक्षात घेऊन कॅनडातील एका महिला खासदाराने पार्लमेंटमध्ये विधेयक आणण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून या कृत्रिम सौंदर्याच्या धोक्यांना वैधानिक आधार मिळेल. ‘आमच्या शरीरावर आमचा अधिकार’ हा विषय केवळ आरोग्यापुरता मर्यादित नसून तो स्त्रीच्या दैनंदिन जगण्यातील सर्वात शक्तिशाली अधिकार आहे. या अधिकाराची जाणीव आणि सन्मान जोपर्यंत समाजात रुजत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण होणार नाही. हा एक अत्यंत गंभीर, पण अनिवार्य असा जागतिक विचार आहे.

## संस्कृत सुभाषित

कुग्रामवासः कुलहीनसेवा, कुभोजनं, क्रोधमुखी च भार्या।
पुत्रश्च मुर्खो, विधवा च कन्या, विनाऽग्निना षट् प्रदहान्ति कायम्।।

अर्थ – वाईट गावात राहणे, कुलशील नसलेल्यांची (चारित्र्यहीनाची) सेवा, वाईट भोजन, रागीट चेहऱ्याची पत्नी, मूर्ख पुत्र आणि विधवा कन्या या सहा गोष्टींमुळे माणूस आगीशिवाय जळतो.

## गुरु वचन

### भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दु:खाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.

साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## उपदेशकथा

### सत्य

पांडुरंगरावांना तीन मुली होत्या. सुस्वरुप, गृहकर्तव्यदक्ष अशा त्या मुलीमध्ये एकच व्यंग होते. त्या तिघीही मुली बोबड्या होत्या. यांचे विवाह कसे होणार, या एकाच चिंतेने पांडुरंगला अस्वस्थ केले होते. एकदा या तिघींना पाहायला तीन मुले येणार होती. म्हणून पांडुरंगने त्या तिघींना ताकीद दिलेली होती की, पाहुण्यासमोर कुणीही बोलायचे नाही.

ठरल्याप्रमाणे पाहुणे आले. चहा – फराळाचे पदार्थ दिले गेले. त्यांचा आस्वाद घेत वधूपरीक्षा सुरु झाली. काहीतरी बोलायचे म्हणून त्या मुलांसोबत आलेले गृहस्थ म्हणाले, वा ! पदार्थ फारच छान झालेत. तुमच्यापैकी कोणी केलेत हे ? यावर थोरली मुलगी लाजत – लाजत म्हणाली, आईने केये नाईट, आमीट केये.

धाकटी मुलगी तिच्यावर रागावून म्हणाली, अगो बाबांनी काय शांगिटले ? बोलायचे नाही म्हणून. यावर मधली म्हणते कशी, ही बोबयी. तू पण बोबयी. पण मीच नाही बोबयी. तिघींच्या संभाषणावरुन त्यांना बघायला आलेल्या वरमंडळींना त्यांच्या व्यंगाबाबतचे गुपित आपोआपच समजले आणि त्यांनी ठरवलेले सर्वकाही उघडकीस आले. पांडुरंगाची तर त्रेधातिरपीट उडाली. वर पक्षाच्या मंडळींनी तर आपोआपच काढता पाय घेतला.

## पंचांग

| | |
|---|---|
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:वृषभ |
| वैशाख शके | चन्द्र:वृषभ२२:४६:२२ |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – जिल्काद |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख –२९ |
| मास– वैशाख | विशेष |
| ऋतु– सौर ग्रीष्म | दर्श अमावास्या |
| कृष्ण पक्ष | भावुका अमावास्या |
| तिथि:अमावस्या | शनैश्वर जयंती |
| २५:३०:४८+ | गोपाळ चैतन्य महाराज |
| नक्षत्र:भरणी १७:३०:०६ | पुण्यथिी – धारेश्वर |
| योग:सौभाग्य १०:२५:१६ | अमावास्या प्रारंभ |
| करण:चतुष्पाद | पहाटी ५.११. |
| १५:२२:५६ | अमावास्या समापती |
| करण:नाग २५:३०:४८+ | उ. रात्रौ १.३१ |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 3 | | | 2 | 8 | | |
| 8 | | | | 4 | 5 | 3 | 1 | 7 |
| 4 | | 5 | 3 | | 1 | | | |
| 9 | | | | | | 6 | | 1 |
| | 8 | | | | | | 3 | |
| 5 | | 1 | | | | | | 2 |
| | | | 9 | | 6 | 7 | | 3 |
| 2 | 5 | 9 | 4 | 7 | | | | 8 |
| | | 7 | 1 | | | 9 | 5 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 6 | 8 | 4 | 7 | 9 | 2 | 1 | 5 |
| 2 | 1 | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 4 | 3 |
| 4 | 5 | 9 | 3 | 1 | 2 | 7 | 6 | 8 |
| 6 | 8 | 5 | 7 | 2 | 1 | 3 | 9 | 4 |
| 7 | 9 | 4 | 8 | 5 | 3 | 6 | 2 | 1 |
| 1 | 2 | 3 | 9 | 6 | 4 | 5 | 8 | 7 |
| 5 | 3 | 2 | 6 | 4 | 8 | 1 | 7 | 9 |
| 9 | 4 | 6 | 1 | 3 | 7 | 8 | 5 | 2 |
| 8 | 7 | 1 | 2 | 9 | 5 | 4 | 3 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२०४ – बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
- १५२७ – फ्लोरेन्सच्या जनतेने मेदिची घराण्याची राजवट उलथवली व प्रजासत्ताक राजवट लागू केली.
- १५६८ – मेरी स्टुअर्ट पळून ईंग्लंडला आली.
- १६०५ – पॉल पाचवा पोपपदी.
- १७७० – १४ वर्षाच्या मेरी आंत्वानेत व १५ वर्षाच्या लुई ऑगुस्तेचेलग्न.
- १८३६ – २७ वर्षाच्या एडगर ऍलन पोने त्याच्या १३ वर्षाच्या चुलत बहिणीशी लग्न केले.

### आंतरराष्ट्रीय

- १८६८ – अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अँड्रु जॅक्सन महाभियोग खटल्यात १ मताने निर्दोष ठरला.
- १८७४ – मॅसेच्युसेटसमध्ये पूर. १३९ ठार.
- १९१८ – अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
- १९२० – पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
- १९२९ – पहिले ऑस्कार पुरस्कार वितरीत.
- १९३८ – अटलांटा येथे एका हॉटेलमध्ये आग. ३५ ठार.

### राष्ट्रीय

- १९७५ – सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करुन घेतले.
- १९९६ – अटलबिहारी वाजपेयी भारताच्या पंतप्रधानपदी.

### जन्म

- १६११ – पोप इनोसंट अकरावा याचा जन्म.
- १९२६ – माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिकाचा जन्म.
- १९३१ – के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्रीचा जन्म.

## : SMS :

Train Me Upar Ki Birth Par Baithe Ek Budde Baba Barbar Bathroom Ja Rahe The. Niche Ki Birth Par Baithi Mahila Ne Pareshan Hokar Pucha- Aapko Chain Nahi Hai Kya? Budde Ne Badi Becheni Se Kaha- Chain To Hai Lekin Khul Nahi Rahi Hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.४ | २८.८ |
| अहमदनगर | ३९.४ | २५.३ |
| अकोला | ४६ | ३३ |
| अमरावती | ४५.१ | ३१.८ |
| बीड | ४८ | ३२.७ |
| भंडारा | ४७.५ | ३१.९ |
| बुलढाणा | ४०.९ | २५.१ |
| चंद्रपूर | ४८.६ | ३२.६ |
| चेन्नई | ४१.३ | ३४.२ |
| नवी दिल्ली | ४१.५ | २७.२ |
| धुळे | ४२.३ | ३०.७ |
| गोंदिया | ४५.४ | ३०.५ |
| जळगाव | ४३.९ | ३०.८ |
| कोल्हापूर | ३८.३ | २५.९ |
| लातूर | ४०.७ | २६.५ |
| मुंबई | ४०.४ | ३६.२ |
| नागपूर | ४४.४ | ३०.८ |
| नांदेड | ४५.३ | २८.९ |
| नंदूरबार | ४०.५ | २९.३ |
| नाशिक | ३८.६ | २५.५ |
| पुणे | ३७.६ | २३.९ |
| पंढरपूर | ४०.८ | २९.३ |
| सातारा | ३८.३ | २५.२ |
| सांगली | ३७.८ | २६.३ |
| सोलापूर | ४१.७ | ३१.८ |
| वर्धा | ४६.४ | ३२.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सहचरणी सोबतच्या संबंधात गोडवा येईल.

**तूळ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर अनेक दिवसांपासून रेंगाळलेली कामे पूर्ण होतील.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर व्यापारातील विचार सार्थक ठरतील. कार्यकुशलता, परिश्रमचे मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण कष्टाला यश मिळेल. कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत.

**मिथून :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण धैर्य आणि सहनशीलता राखा. तसेच बुद्धिमतेने कामे हताळा. नवीन योजना तयार होतील.

**धनू :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम उद्योग–धंद्यात निष्काजीपणा, उतावळेपणा करु नका. डोके शांत ठेवावे लागेल.

**कर्क :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष दिले पाहिजे. विनाकारण एखाद्याशी वाद होऊ शकतो.

**मकर :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण कामकाजात वाढ होईल, परंतू कामाचे योग्य फळ पदरात पडेल.


**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर लाभाच्या संधी येतील. कामाविषयी उत्साह काय राहिल. मदत करुन मानसिक सुख मिळवाल.

**कुंभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम कठिण तसेच जबाबदारीच्या कामात विशेष सावधानतेचा परिचय द्यावा लागेल.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम महत्तवाकांक्षा पूर्ण होतील. कामकाजात विस्तार होऊ शकेल.

**मीन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व कुटूंबात योग्य ती कामे होतील. कामाच्या प्रशंसतेचे योग संभवतील.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९५०



**आडवे शब्द**

१. आनंदाने नाव ठेवणे!
४. पृथ्वी
६. सुवास
८. घट्ट, ताणलेले
१०. जीभ
११. तुरुंगवासातील खडीफोड
१२. छाती
१३. त्रास
१६. क्षमा करण्याचा स्वभाव
१८. पावसाची झड
२०. घरणे
२२. शपथ
२३. गोव्यातील शिवशंभो
२४. प्रामाणिक, सोज्वळ
२६. किंमत
२७. गाढव
२९. आदिमाया
३०. एकत्रित भोजन
३३. देण्याची इच्छा
३६. उद्याच्या नंतरचा दिवस
३८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे
४१. कानाजवळचा कपाळाचा भाग
४४. शीख धर्माचे संस्थापक
४५. काव्यात तुझे
४६. कोडकौतुक
४७. यज्ञोपवित
४८. अधाशीपणा
५०. माहात्म्य
५१. होडी
५२. किंचित वक्रता
५४. अधांतरी अडकणे, ५५. भात शिजतानाचा आवाज
५७. गुंतलेल्या बटा
५८. बालचमूची गाणी
६०. दात
६२. सत्त्व
६४. रवाळ
६६. क्रिकेटमधील धाव
६७. स्वच्छ
६८. कहाणीतील गाव
७०. धरबंद नसलेला, मोकळा
७२. काचेचा उभा मणी
७४. वर्ण, रंग
७५. पैलवानांचा गुरु
७६. वागणूक
७७. सभ्य, प्रामाणिक
७८. रमल विद्या जाणणारा
८०. घोड्यावरून मारलेला फेरफटका
८१. संघर्ष, युद्ध
८२. हेवादावा
८३. छत

**उभे शब्द**

१. श्रीफळ
२. चामखीळ
३. तंबूची कापडी भिंत
४. रक्त देणे
५. समजूत, सामोपचार
६. पारखी
७. भूमीचे मार्दव सांगणारे गवताच्या पात्याचे हलणे
९. हत्तीचा रथ
१४. मित्र
१५. गरीबांवर दया करणारा परमेश्वर
१७. धमनी, नाडी
१८. शाश्वत, टिकणारा
१९. लेखणी
२१. दरवाजा
२२. हिंदुस्तान
२५. मदतनीस
२७. पक्षी
२८. शरीर
३०. काजळ, सुरमा इ.
३१. अधू, अपंग
३२. तापविणारा सूर्य
३३. कोर्टातील खटला
३४. साधनेसाठी योग्य अरण्य
३५. बहुरूपी
३७. ठराविक पैसे
३९. आंचळ
४०. देखावा, आरास
४१. धूर्त, लबाड
४२. सरहद्द, वेस
४३. हावरटपणा
४४. पिकांचा नाश करणारा पाऊस, नासलेले दुध
४५. तमाशात काम करणारा
४९. समाजातील दबदबा
५१. कळ लावणारा मुनी
५३. वटवट, त्रास
५६. फळावरील साल
५८. लहान, छोटा
५९. सर्वस्व
६१. नखरेबाज
६३. कांबळी विणणारी जमात
६४. वराची बहीण
६५. श्रीकृष्णाचे एक नाव
६७. वर्षानुवर्ष
६९. वाटसरूंची उन्हाळ्यातील सोय
७१. प्रफुल्लता
७३. खाटीक
७९. पंगतीतील ताक

### जम्बो शब्दकोडे क्र. ९४९ चे उत्तर

आडवे उत्तर १.नामवंत ३.राखणदार ७.धन्यवाद १०.नार ११.वजन १२.समाधानी १३.दरड १५.पाणउतारा १७.नवा १९.घोळ २०.तट २२.चाकरचुकर २६.पाल २७.करतल ३०.कष्ट ३१.कालापव्यय ३२.रवि ३३.कुंचला ३४.जमा ३६.स्पर्धक ३७.पोक ३९.सामान ४०.रसद ४२.संमार्जन ४५.दळभद्री ४६.यशवंतराव ४८.सागर ५०.घन ५१.लवा ५३.वाल ५४.गबाळ ५६.रसा ५७.विनायक ५८.थानेदार ६०.तारतम्य ६२.नभ ६३.बारीकसा ६४.विद्यालय ६७.पारख ६८.चळत ६९.दाहक ७१.टमटम ७५.रवाना ७७.वाडा ७८.कान ७९.कानन ८०.स्वयंपाक ८१.तबला

उभे उत्तर : १.नाना पाटेकर २.मरण ३.राज ४.खनन ५.दास ६.रमावर ७.धनी ८.वादळ ९.दर ११.वरात १४.डबल १६.उसंत १८.वाचा १९.घोरपड २१.टकटक २३.कवच २४.चुका २५.कला २६.पायजमा २८.रविवार २९.लज्जास्पद ३३.कुंती माद्री ३५.मानव ३८.करवंद ३९.सातारा ४१.सतार ४२.संभव ४३.नयनरम्य ४४.विसावा ४५.दरबार ४७.वलय ४९.गलथान ५२.वाकडातिकडा ५४.गदा ५५.तारक ५७.विशाल ५९.नेभळट ६०.तारीख ६१.तसाच ६३.बारदान ६४.वितरक ६५.यदा ६६.मटका ७०.हवाला ७२.मन ७३.मका ७४.ऱ्हस्व ७६.नात

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुविधा

पुणे (दैनिक संध्या) : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Services (CDS) परीक्षेची पूर्वतयारी करून देण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे CDS कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात आला आहे. हा प्रशिक्षण वर्ग १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार असून निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी १४ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहावे असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे. उमेदवारांनी Department Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या संकेतस्थळावरून CDS ६७ कोर्सचे प्रवेशपत्र व संबंधित परिशिष्टांची प्रिंट घेऊन ती पूर्ण भरून दोन प्रतींसह मुलाखतीस यावे. प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून त्यांनी UPSC मार्फत घेण्यात येणाऱ्या CDS परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दि. ०९ जून २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे मुलाखतीस उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी training.pctcnashik@gmail.com या ईमेलवर किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ तसेच व्हॉट्सअॅप क्रमांक ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

### नव भारत साक्षरता कार्यक्रमासाठी उसनवारी तत्वावरील पदभरती अर्जास मुदतवाढ

पुणे (दैनिक संध्या) : शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यावतीने केंद्र पुरस्कृत नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विविध पदांसाठी उसनवारी तत्वावर शिक्षक व अधिकारी संवर्गातील पात्र कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र अपेक्षित प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्याने अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. हा कार्यक्रम राज्यातील १५ वर्षे व त्यापुढील वयोगटातील नागरिकांसाठी राबविण्यात येत असून स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासकीय सेवेत कार्यरत शिक्षक, उपशिक्षणाधिकारी किंवा तत्सम गट-ब पदावरील अधिकारी, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक, विस्तार अधिकारी (शिक्षण) तसेच तत्सम पदांवरील इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्यासाठी गुगल लिंक शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून अर्ज भरण्याचा कालावधी १५ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत राहणार आहे. प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, अनुभव, मुलाखत, सादरीकरण आदी निकषांच्या आधारे नियुक्ती प्रक्रिया संचालनालय स्तरावर राबविण्यात येणार असल्याचे शिक्षण संचालनालयाने कळविले आहे.

### पुणे शहर तहसिल कार्यालयात तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार १८ मे रोजी सकाळी १० वाजता तहसिल कार्यालय पुणे शहर, ९३१ शुक्रवार पेठ, पुणे येथे करण्यात आल्याची माहिती पुणे शहरचे तहसीलदार स्मिता माने यांनी दिली. या दिवशी नागरिकांनी त्यांच्या समस्या लोकशाही दिनीच लेखी स्वरुपात अर्ज सादर कराव्यात,असे आवाहन तहसीलदार श्रीमती माने यांनी केले आहे.

### एसटी प्रवास महागात! पुण्यात भरदिवसा महिला प्रवाशाचे 8 लाखांचे दागिने चोरीला

पुणे (दैनिक संध्या) : आभासी चलन व्यवहारातील (क्रिप्टो करन्सी वॉलेट) खात्यातून दहा लाखांची रोकड सायबर चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध बाणेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका ४१ वर्षीय तरुणाने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण बालेवाडी भागात राहायला आहे. तरुणाने आभासी चलन व्यवहारात काही रक्कम गुंतविली आहे. या व्यवहारातील दहा लाखांची रक्कम वॉलेटमध्ये जमा करण्यात आली होती. सायबर चोरट्यांनी संबंधित वॉलेटमध्ये तांत्रिक छेडछाड (ब्लॉकचेन अॅड्रेस, प्रायव्हेट की) करुन दहा लाख रुपयांची रक्कम लांबविली. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक अलका सरग तपास करत आहेत.

### शेअरमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने 25 लाखांची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने वेगवेगळ्या घटनेत सायबर चोरट्यांनी तिघांची २५ लाखांची फसवणूक केली. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने हडपसरमधील काळेपडळ भागात राहणाऱ्या एका ५२ वर्षीय तक्रारदाराची सायबर चोरट्यांनी नऊ लाख २३ हजारांची फसवणूक केली. याबाबत एकाने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अण्णासाहेब बाबर तपास करत आहेत.

# विविध खात्यांच्या कामकाजाचा आढावा बैठक संपन्न

**नागरिक सुविधांवर भर**



पुणे (दै. संध्या)

शहरातील नागरिकांना अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि कार्यक्षम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी गुरुवारी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

या बैठकीस अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, अतिक्रमण विभागाचे सोमनाथ बनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी उल्का कळसकर, मुख्य अभियंता (पाणीपुरवठा) नंदकिशोर जगताप, उपआयुक्त (सुरक्षा) आशा राऊत, मुख्य अभियंता (ड्रेनेज) जगदीश खानोरे तसेच आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान विविध विभागांच्या अंदाजपत्रक तरतुदी, सुरू असलेली विकासकामे आणि नागरिकाभिमुख सेवांचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे यांनी प्रशासनाला विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

समान पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित कामे पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्यासाठी गती देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मेट्रो कामांमुळे दांडेकर पूल ते सिंहगड रस्ता जलशुद्धीकरण केंद्रादरम्यान होणाऱ्या पाईपलाईन स्थलांतरासाठी वाहतूक शाखेकडून तातडीने परवानगी मिळविण्याचे आदेश देण्यात आले. मनपा इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबवून जलसंधारणाला चालना देण्याबरोबरच सांडपाणी थेट नदीत न सोडता एसटीपी प्रकल्पांपर्यंत वळविण्याची कार्यवाही करण्याचे निर्देशही देण्यात आले.

तलावातील गाळ काढण्याची कामे महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत प्रभावीपणे राबविणे तसेच शहरात नवीन टँकर पॉईंटसाठी जागा ताब्यात घेऊन जलपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यावरही भर देण्यात आला. आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना महानगरपालिकेच्या रुग्णालयांमधील ६ प्रसूतिगृहे, ५ सर्वसाधारण रुग्णालये आणि ६ एनआयसीयू अद्ययावत करण्याची कामे पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. सिंहगड रस्ता परिसरातील लायगुडे दवाखान्याचे आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

शहरी गरीब योजनेअंतर्गत रुग्णालयांना वेळेवर देयके मिळण्यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच K.E.M. Hospital येथील उपचार सुविधा पुन्हा सुरू करण्यासाठी उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला.

समाविष्ट गावांमध्ये लसीकरणासाठी कार्यरत निरामय संस्थेला आवश्यक प्रशासकीय सहकार्य देण्याबरोबरच जिल्हा परिषदेची आरोग्य यंत्रणा पूर्णपणे हस्तांतरित नसल्याने उद्भवणाऱ्या अडचणी डीपीडीसीमध्ये मांडण्याचे निर्देशही देण्यात आले.

शहरातील भटक्या कुत्र्यांसाठी शेल्टर आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच स्वतंत्र प्राणी उपचार केंद्र उभारण्याचा प्रस्तावही चर्चेत आला. पाळीव प्राण्यांसाठी 'डॉग गार्डन' विकसित करण्याची संकल्पना राबविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच डुकरांच्या नियंत्रणासाठी नियुक्त एजन्सींचे संपर्क क्रमांक सार्वजनिक करण्याचे आदेशही देण्यात आले.

महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी शववाहिका (पुष्पक) आणि बसेस उपलब्ध करून देण्याबरोबरच सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवून आवश्यकतेनुसार तीन शिफ्टमध्ये नेमणुका करण्याबाबत पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अतिक्रमण विभागाने विशेष मोहीम राबवावी तसेच आऊटसोर्स पद्धतीने अतिक्रमण निरीक्षक नेमण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेशही महापौरांनी दिले.

महापौर मंजुषा नागपुरे यांनी सर्व विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देत नागरिकांना अधिक कार्यक्षम सेवा देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

## जनगणना कार्यक्रमास अनुपस्थिती अंगलट; शिक्षक कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा

पुणे (दै. संध्या)

केंद्रशासनाच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या जणगणना २०२७ कार्यक्रमास अनुपस्थिती लावणाऱ्या एका शाळेतील सात शिक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत फुरसुंगी नगरपरिषदेचे कर अधिकारी आबासाहेब दादासाहेब मुढे (वय ३०) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सात शिक्षकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जणगणना २०२७ च्या कार्यक्रमासाठी अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांतील कर्मचारी, तसेच 'आशा वर्कर' यांची प्रगणक आणि पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत २३ ते २५ एप्रिल दरम्यान उरळी देवाची नगरपरिषद कार्यालयात जनगणना प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. फुरसुंगीतील वॉलनेट स्कूलमधील शिक्षकांसह सात जणांना प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, संबंधित शिक्षक आणि कर्मचारी पूर्वपरवानगी न घेता अनुपस्थित राहिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जनगणना अधिनियम १९४८ कलम ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक ढावरे तपास करत आहेत.

## स्मारकाच्या नूतनीकरणाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील डेक्कन जिमखाना परिसरातील भव्य धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या नूतनीकरणाच्या कामाचा भूमिपूजन समारंभ गुरुवारी (दि. १४ मे) धर्मवीर संभाजी महाराजांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त उत्साहात पार पडला. या स्मारकाच्या नूतनीकरणासाठी भूमिपूजन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी धर्मवीर संभाजी प्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने सकाळी शंभूराजांचा जन्मोत्सव सोहळा आणि पाळणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच पुण्यातील इतिहास संशोधक आणि नित्यपूजा करणाऱ्या विविध संस्थांचा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून येत्या एका वर्षात या स्मारकाच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील."



प्रतिष्ठानचे संस्थापक व माजी उपमहापौर सुरेशनाना नाशिककर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "या स्मारकाच्या माध्यमातून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य, चरित्र आणि विचार अधिक व्यापक पातळीवर समाजापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे."

या कार्यक्रमाला माजी उपमहापौर परशुराम वाडेकर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, माजी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, तसेच नगरसेवक राघवेंद्र मानकर, अपूर्व खाडे, अमृता म्हेत्रे, सुनिल पांडे, निवेदिता एकबोटे, अल्पना वरपे, पृथ्वीराज सुतार, विशाल धनावडे, धीरज घाटे, मंजुश्री खर्डेकर, मिताली सावळेकर, नारायण गलांडे, तेजश्री पवळे यांच्यासह पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, पदाधिकारी, उपायुक्त, स्थानिक नागरिक आणि प्रतिष्ठानचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रमेश परदेशी यांनी केले.

## पुणे इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

### चलवादी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. हुलगेश चलवादींकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

पुणे (दै. संध्या)

चलवादी शिक्षण संस्था संचलित पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेजने २०२५-२६ च्या इयत्ता १२ वी सीबीएससी (विज्ञान शाखा) परीक्षेत यशाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत साग्रिक कर याने ९४.६% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशात लक्ष्य वैश आणि पाखी प्रियंवदा या दोघांनी ९४.२% गुणांसह द्वितीय क्रमांक, तर हर्ष तराणी याने ९३.८% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि सातत्याचे फळ आहे. पुणे इंटरनॅशनल स्कूलमध्ये आम्ही केवळ अभ्यासावरच नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देतो. या यशात शिक्षक आणि पालकांचाही मोठा वाटा आहे, अशी भावना विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल बोलताना संस्थेचे अध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या उपाध्यक्षा अॅड. रेणुका चलवादी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, "मुले आणि मुली दोघांनीही परिक्षेत संपादन केलेले यश कौतुकास्पद आहे. दर्जेदार शिक्षण आणि शिस्त यांच्या जोरावर आमच्या विद्यार्थ्यांनी हे शिखर गाठले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या पालकांचे त्यांनी अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या या दैदीप्यमान यशात पुणे इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य स्मिता लोंढे, व्यवस्थापिका सायली शिंदे, उपप्राचार्य ज्योती सचदेवा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षिका अर्पिता रथ, श्रद्धा मोहिते, प्रियांका कांबळे, सीमा राठोड , रश्मी केशरवाणी, चैत्राली काकडे, संगीत शर्मा , जयंत निंबाळकर यांच्यासह सर्व कर्मचारी वृंदाने विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी वर्षभर कठोर परिश्रम घेतले.वर्षभर शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन, घेतलेली मेहनत आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## 'देहविक्री'च्या आरोपाखाली खंडणी

पुणे (दै. संध्या)

मसाज पार्लरमध्ये देहविक्री सुरू असल्याचा आरोप करुन मसाज पार्लर चालक महिलेकडून ३० हजार रुपयांची खंडणी उकळणाऱ्या दोन महिलांसह पाच जणांना खराडी पोलिसांनी अटक केली. खराडी भागात ही घटना घडली. या प्रकरणी प्रतीक जयवंत गायकवाड (वय ३१, रा. कामराजनगर, येरवडा, तसेच लांडोबा वस्ती, केसनंद), विशाल अशोक साळवे (वय ४०, रा. शंकरराव जाधवनगर, विश्रंतवाडी), रोहित नागनाथ मांढरे (वय ३२, रा. येरवडा), छाया सुखदेव कांबळे (वय ४०, रा. लक्ष्मीनगर, येरवडा), सुनीता संजय लोंढे (वय ४३, रा. टेम्पो चौक, वडगावशेरी) यांना अटक करण्यात आल याबाबत एका महिलेने खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खराडी भागात मसाज पार्लर आहे. मसाज पार्लरमध्ये देहविक्रय करते, असा आरोप आरोपींनी केला होता. दोन महिला आणि साथीदारांनी महिलेला धमकावले. या प्रकरणात पोलिसांकडे तक्रार करणार आहोत, असे सांगून महिलेकडे दोन लाख रुपयांची खंडणी मागितली. एका आरोपी महिलेने तक्रारदार महिलेला मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी तडजोडीत दीड लाख रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर तक्रादार महिलेने आरोपींना ३० हजार रुपये दिले. त्यानंतर आरोपींनी पोलिसांकडे तक्रार करणार नाही, असे सांगितले. पोलिसांकडून कारवाई होणार नाही. आम्ही मध्यस्थी करु, असे आरोपींनी महिलेला सांगितले.

गुरुवारी (१४ मे) महिलेला कोरेगाव पार्क परिसरात उर्वरित रक्कम घेऊन कोरेगाव पार्क भागात बोलाविले. त्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, खंडणी, धमकी, तसेच मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'अॅग्री हॅकॅथॉन'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून पुण्याची ओळख - उपमुख्यमंत्री

**'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' आयोजित कार्यक्रमात महिला शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन**

पुणे (दै. संध्या)

गतवर्षी जून महिन्यामध्ये आयोजित पुणे अॅग्री हॅकॅथॉनातील १६ नाविण्यपूर्ण उत्पादनांपैकी निवडलेल्या ४ उत्पादनांना कृषी यांत्रिकीकरण योजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही राज्य शासनामार्फत सुरु आहे. या वर्षी विविध राज्यातील सुमारे १ हजार ३०० स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून यामध्ये महाराष्ट्र राज्यातून ८६७ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. यामुळे अॅग्री हॅकॅथॉनच्या यशस्वी आयोजनातून पुणे हे विद्येच्या माहेरघरासोबतच कृषी तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून ओळखले जात आहे, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. संयुक्त राष्ट्रांने यंदाचे 'आंतरराष्ट्रीय महिला



शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केले असून या पार्श्वभुमीवर राज्यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये अधिकाधिक महिला शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालयाच्या सिंचननगर येथील दुसऱ्या पुणे अॅग्री हॅकॅथॉन-२०२६ च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, ग्रीनरोड इनोवेशन इस्रायलचे अध्यक्ष शफरीर गोडेल, जुरी कमिटी सह अध्यक्ष प्रा.डॉ. के. ई. लवांडे, डॉ. राजाराम देशमुख, सुपर जुरी तथा महाराष्ट्र कृषी तंत्रज्ञ संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. उमाकांत दांगट आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रात देशात आघाडीवर असलेलं राज्य असून ऊस, साखर, भाजीपाला उत्पादन आणि फलोत्पादनात तसेच कृषी निर्यातीतदेखील अग्रेसर आहे. कृषी क्षेत्रासाठी 'कृत्रीम बुद्धीमत्ता धोरण' (एआय पॉलिसी) जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एआय पॉलिसीकरीता सन २०२५ च्या अर्थसंकल्पात यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करुन ठेवली होती. तसेच त्यांच्या प्रयत्नामुळेच बारामती येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कृत्रीम बुद्धीमत्ता केंद्र उभारण्यात आले आहे. त्या पुढे म्हणाल्या, राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्तेबरोबरच कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी कृषी समृध्दी योजना जाहीर केली. त्यासाठी अर्थसंकल्पात २ हजार कोटी रुपयांची तरतुद केली आहे. यावर्षीच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना खतांची अडचण येणार नाही याची काळजी घेतली जात आहे. हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार यावर्षी पाऊस कमी झाल्यास उद्भवणाऱ्या परिस्थितीत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. हॅकॅथॉन ही संकल्पना प्रामुख्यानं माहिती व तंत्रज्ञान आणि वित्तीय क्षेत्रात वापरली जात होती, कृषी क्षेत्रातील विविध नवनवीन उपाययोजना पुढे येवून कृषी विकासात त्याचा फायदा होईल, याच धर्तीवर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून अॅग्री हॅकॅथॉनचे आयोजन करण्याची संकल्पना पुढे आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या संकल्पनेला भक्कम पाठिंबा दिला. गतवर्षी जून महिन्यामध्ये पुणे अॅग्री हॅकॅथॉने प्रथमच आयोजन करण्यात आले आणि ते यशस्वी देखील झाले. या हॅकॅथॉनमध्ये १६ नाविण्यपूर्ण उत्पादनांची निवड करण्यात आली आणि विजेत्यांना मोठी पारितोषिकंही देण्यात आली. आजच्या घडीला १६ पैकी १२ उत्पादनांना कृषी विद्यापिठांचे प्रमाणिकरण प्राप्त झाले आहे. यशस्वी नवतंत्रज्ञांना कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यासारख्या संस्था सहकार्य करीत आहेत. निवडलेल्या उत्पादनांपैकी ४ उत्पादनांना कृषी, यांत्रिकीकरणयोजनेत समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे. यावर्षीच्या हॅकॅथॉन स्पर्धेसाठी ९ विषयांचा समावेश आहे. यावर्षी विविध राज्यातील सुमारे १ हजार ३०० स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून महाराष्ट्र राज्यातून ८६७ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. सलग दुसऱ्या वर्षी या पुणे अॅग्री हॅकॅथॉनचं यशस्वी आयोजन केल्याबद्दल राज्याचा कृषी विभाग, जिल्हा प्रशासनाच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. हॅकॅथॉनमध्ये सहभागी उत्पादन, संशोधन, प्रयोग या शेतकऱ्यांकरिता उपयुक्त असून याचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले. बदलत्या काळानुरुप शेतकऱ्यांसमोर अनियमित पाऊस, पाण्याची टंचाई, मातीची निकृष्ठता, बाजारपेठेतील अस्थिरता, हवामान बदल आणि वाढता उत्पादन खर्च यासारखी विविध आव्हाने आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्याकरिता कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाची जोड, नवकल्पना आणि युवकांच्या उर्जेचा योग्य वापर खरा उपाय ठरेल. अॅग्री हॅकॅथॉन मध्ये सहभागी युवक, अभियंते, डेटा साइंटिस्ट, कृषी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि स्टार्टअप उद्योजक कृषी क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी आपली बुध्दिमत्ता आणि सर्जनशीलता वापरतील. आपल्या उपायोजना, नवकल्पना शेतकऱ्यांच्या शेतात, मोबाईल अॅपमध्ये, ड्रोनमध्ये, सेन्सर्समध्ये आणि एआय आधारित प्लॅटफॉर्ममध्ये प्रत्यक्षात वापरले जातील. कृषी विभागानं या हॅकॅथॉनसाठी जे प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन दिले आहेत, त्याबद्दल कृषी विभागाचे आणि सर्व आयोजकांचे अभिनंदन करुन त्या म्हणाल्या, आपल्या सर्वांच्या प्रयत्नांनी महाराष्ट्र हे कृषी नवकल्पांचे केंद्र बनेल, असा विश्वास श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

डॉ. लवांडे म्हणाले, कृषी क्षेत्रातील अडीअडचणी नाविन्यपूर्ण कल्पनेच्या माध्यमातून सोडविण्याच्याहष्टीने सन २०२५ पासून 'पुणे अॅग्री हॅकॅथॉन' चे आयोजन करण्यात येत आहे. पुणे अॅग्री हॅकॅथॉन-२०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी 'आयमॅट' संस्थेच्यावतीने करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### अमनोराचा शंभर टक्के निकाल

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील अमनोरा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने यंदा शंभर टक्के निकालाची नोंद केली असून विज्ञान, वाणिज्य आणि मानवविद्या शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. विज्ञान शाखेत अभिनंदन जिनेंद्र पाटील यांनी ९०.६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत आस्था महाजन हिने ९६.६ टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले, तर मानवविद्या शाखेत तेजस्वी खानवॉकर हिने ९६.६ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा असल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वांगीण विकास यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना सक्षम घडविण्याचे कार्य विद्यालय सातत्याने करत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले. विद्यालयाच्या संचालिका मीरा नायर म्हणाल्या, "बारावी मंडळ परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचा आम्हाला अत्यंत अभिमान आहे विद्यार्थ्यांनी समर्पण, शिस्त आणि गुणवत्तेचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे. शंभर टक्के निकालासह अव्वल विद्यार्थ्यांनी ९६.६ टक्के गुण मिळवले आहेत. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या संयुक्त प्रयत्नांचे फलित आहे." विद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.




### हॉटेल उद्योगात मनुष्यबळाची तीव्र कमतरता

■ 'डायरेक्ट प्लेसमेंट" हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमाला वाढता प्रतिसाद

पिंपरी-चिंचवड (दैनिक संध्या) : भारतातील हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, हॉटेल उद्योगाला प्रवेश-स्तरीय प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी कमतरता जाणवत आहे. भरतीतील तूट, उच्च ॲट्रिशन (कामगार गळती) आणि तात्काळ कामासाठी तयार उमेदवारांची गरज लक्षात घेता, 'डायरेक्ट प्लेसमेंट' आधारित हॉस्पिटॅलिटी व्होकेशनल डिप्लोमा पाथवे हा प्रभावी आणि व्यावहारिक पर्याय म्हणून पुढे येत आहे. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात केवळ व्यवस्थापक किंवा वरिष्ठ तज्ज्ञांचीच नव्हे, तर शिस्तबद्ध, सेवा-केंद्रित आणि ऑपरेशन्सशी पटकन जुळवून घेणाऱ्या प्रवेश-स्तरीय कर्मचाऱ्यांची मोठी गरज असते. विविध बाजारपेठांमध्ये कुशल-अकुशल श्रेणीत 30 ते 40 टक्क्यांपर्यंत मनुष्यबळाची कमतरता जाणवत असल्याने उद्योग असंघटित भरतीऐवजी संरचित वर्कफोर्स पाइपलाइनकडे वेगाने वळत आहे. पारंपरिक "प्रथम प्रशिक्षण, नंतर नोकरी" या पद्धतीऐवजी, या मॉडेलमध्ये उमेदवारांना सुरुवातीपासूनच प्रत्यक्ष हॉटेलमध्ये कामाची संधी मिळते. उमेदवार थेट नोकरीला सुरुवात करतात आणि त्याचवेळी ग्रूमिंग, वर्कप्लेस रेडीनेस (कामाच्या ठिकाणी तयारी) तसेच संरचित व्होकेशनल डिप्लोमा फ्रेमवर्क अंतर्गत टप्प्याटप्प्याने प्रगती करतात. त्यामुळे उद्योगाला तात्काळ उपयुक्त कर्मचारी मिळतात आणि उमेदवारांना प्रत्यक्ष अनुभवासह करिअरची मजबूत दिशा मिळते. या पाथवे कार्यक्रमात उमेदवारांची ओळख व ऑनबोर्डिंगनंतर संवाद कौशल्य, व्यावसायिक शिस्त, सेवा-दृष्टिकोन, ग्रूमिंग मानके, हॉस्पिटॅलिटी वर्तनशैली यावर विशेष भर दिला जातो. त्यानंतर उमेदवारांना प्रत्यक्ष हॉटेल भूमिकांमध्ये प्लेसमेंट दिले जाते, ज्यामुळे त्यांना वास्तविक ऑपरेशनल अनुभव मिळून आवश्यक कौशल्ये आणि व्यावसायिक सवयी प्रत्यक्ष कामातून विकसित होतात. अधिक माहितीसाठी या नंबरवर कॉल / व्हाट्स अँप 9769559855 / 9769761099 संपर्क साधावा.

### संतूर लाईमची नवीन टीव्ही जाहिरात लाँच




बेंगळुरू (दैनिक संध्या) : विप्रो कंझ्युमर केअर अँड लाइटिंगचा प्रमुख ब्रँड असलेल्या संतूरने संतूर लाइम साबणासाठी नवीन टीव्ही जाहिरात लाँच केली आहे. ही जाहिरात आजच्या व्यस्त दिनचर्येत दररोज स्वतःला पुन्हा ताजेतवाने आणि रिचार्ज करण्याच्या कल्पनेवर आधारित आहे. "3x फ्रेशनेस" या आश्वासनासह हा साबण प्रत्येक वापरानंतर दीर्घकाळ ताजेपणाची अनुभूती देतो. संतूर लाइम साबणामध्ये लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल यांचे मिश्रण आहे, ज्यामुळे थंडावा देणारा आणि ताजेतवाना करणारा आंघोळीचा अनुभव मिळतो. टिल्ट ब्रँड सोल्युशन्सने संकल्पित केलेली ही टीव्ही जाहिरात एका शिक्षिकेची कथा दाखवते, जी एक आईसुद्धा आहे. ती शाळा आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळते. दिवसभराच्या धावपळीत ती थकलेली दिसते, तिच्यावरचा ताण जाणवू लागतो, पण थोडी विश्रांती मिळाल्यानंतर तिचा मूड बदलतो. त्यानंतर संतूर लाइम साबणाने आंघोळ केल्यानंतर ती पूर्णपणे "100% रिचार्ज" झाल्यासारखी ताजेतवानी होते आणि पुन्हा उत्साहाने आपले काम पुढे सुरू करते. या मोहिमेबद्दल बोलताना, एस. प्रसन्ना राय, चीफ मार्केटिंग ऑफिसर, विप्रो कन्झ्युमर केअर म्हणाले, "लिंबू, एलोवेरा आणि मेंथॉल या तीन घटकांचे फायदे एकत्र करून आम्ही साबणाचा फ्रेशनेस अनुभव अधिक चांगला आणि ताजेतवाना केला आहे. यामुळे आंघोळ केल्यानंतर शरीराला अधिक ताजेतवाने वाटते. ही मोहीम थकलेल्या अवस्थेतून पुन्हा उत्साहाने दिवसाला सामोरे जाण्याचा नैसर्गिक अनुभव दाखवते.

### महाराष्ट्रातील वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील सदाशिव पेठ परिसरात अलीकडे 25 तास वीज खंडित राहिली. ही समस्या एमएसईडीसीएलच्या एका युनिटमधील उपकरणांवर अतिउष्णतेचा परिणाम झाल्यामुळे निर्माण झाली. जास्त उष्णतेमुळे उपकरणे जास्त गरम झाली आणि महत्त्वाच्या भागांचे नुकसान झाले, ज्यामुळे आग लागली. या घटनेमुळे 5,500 पेक्षा जास्त ग्राहक प्रभावित झाले. तीव्र उष्णतेच्या लाटेत अनेक घरांमध्ये वीज नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. ही एकमेव घटना नाही. पुण्यातील वानवडी, शांतिनगर आणि जगताप चौक या भागांमध्ये अलीकडे फीडर दुरुस्तीसाठी सुमारे सहा तास नियोजित वीज खंडित करण्यात आली होती. तसेच नागपूरमध्ये 873 मेगावॅटच्या विक्रमी मागणीमुळे वारंवार वीज ट्रिप होणे आणि दीर्घकाळ वीज खंडित राहण्याच्या घटना घडल्या. वीज पुरवठ्यातील अशा प्रकारच्या कपातीमुळे लोकांच्या दैनंदिन जीवन आणि व्यवसायांवर गंभीर परिणाम होत आहे. वीज नसल्यामुळे हजारो नागरिकांना पंखे आणि एसीशिवाय तीव्र उष्णतेचा सामना करावा लागतो. तसेच रुग्णालयांना आवश्यक सेवा सुरू ठेवण्यात अडचणी येतात आणि लहान व्यवसायांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

## हृदयासाठी ५ सुपरफूड्स

# तुमची हृदयवाहिनी प्रणाली मजबूत ठेवा

नवी दिल्ली (दै. संध्या) :



आजच्या वेगवान जीवनशैलीत शारीरिक हालचालींचा अभाव आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवर वाढती अवलंबित्व यामुळे उच्च कोलेस्टेरॉल, उच्च रक्तदाब आणि इतर हृदयविकारांच्या समस्या अधिक सामान्य होत आहेत. हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी योग्य पोषण महत्त्वाचे असून, बदाम, फॅटी फिश, हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये आणि फळांसारखे पोषक तत्वांनी समृद्ध अन्न आहारात समाविष्ट केल्यास मोठा फायदा होऊ शकतो. ऋतिका समद्दार, मॅक्स हेल्थकेअरमधील प्रादेशिक प्रमुख – डायटेटिक्स, यांनी हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त अशा काही सर्वोत्तम खाद्यपदार्थांविषयी माहिती दिली आहे, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यास आणि दीर्घकालीन आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात. दररोजच्या आहारात एक मूठभर बदामांचा समावेश करणे ही चांगली सुरुवात ठरू शकते, कारण ते पोषक तत्वांनी समृद्ध असून एक आरोग्यदायी सुपरफूड मानले जाते. बदामांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रथिने, रिबोफ्लेविन, झिंक यांसह 15 आवश्यक पोषक घटक आढळतात. निरोगी आहाराचा भाग म्हणून कॅलिफोर्निया बदामांचा समावेश केल्यास एकूण आणि LDL कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते तसेच हृदयाला हानी पोहोचवणारी सूज कमी होऊ शकते. जर्नल ऑफ द अमेरिकन हार्ट असोसिएशन मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, दररोज 42 ग्रॅम बदामांचे सेवन केल्याने हृदयविकाराशी संबंधित अनेक जोखीम घटकांमध्ये सुधारणा झाली आणि HDL कोलेस्टेरॉलमध्येही लक्षणीय वाढ झाली. दररोज किंवा साप्ताहिक आहारात फॅटी फिशचा समावेश करणे हे हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी उत्तम मानले जाते, कारण त्यामध्ये ओमेगा-3 फॅटी ॲसिड्स आणि आवश्यक निरोगी फॅट्स मुबलक प्रमाणात असतात. हे घटक हृदयवाहिनी प्रणाली निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. सॅल्मन, मॅकरल, सार्डिन, ट्युना आणि ट्राउट यांसारखे मासे सूज कमी करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. ओमेगा-3 फॅटी ॲसिड्स चांगले कोलेस्टेरॉल (HDL) वाढवतात, अनियमित हृदयस्पंदनाचा धोका कमी करतात आणि धमन्यांमध्ये प्लाक जमा होण्यापासून संरक्षण करतात. हिरव्या पालेभाज्यांमध्ये आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. पालक, केल आणि ब्रोकली यांसारख्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन K, नायट्रेट्स आणि फोलेट यांसारखे पोषक घटक असतात, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि एकूण हृदयवाहिनी कार्यक्षमतेला समर्थन देण्यास मदत करतात.

कडधान्ये ही कोणत्याही आहारातील हृदयासाठी उपयुक्त भर मानली जातात. त्यामध्ये वनस्पतीजन्य प्रथिने, फायबर आणि आवश्यक पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात, तर चरबीचे प्रमाण कमी असते. मसूर, बीन्स, हरभरा आणि वाटाणा यांसारखे पदार्थ खराब कोलेस्टेरॉल (LDL) कमी करण्यास, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तदाब संतुलित ठेवण्यास मदत करतात. त्यातील जास्त प्रमाणातील फायबर पचन सुधारते आणि निरोगी वजन राखण्यास मदत करते, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

ताजी फळे ही हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी नैसर्गिक आणि प्रभावी उपाय आहेत. त्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. बेरीज, संत्री, सफरचंद, केळी आणि डाळिंब यांसारखी फळे सूज कमी करण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतात.

## राष्ट्रीय डेंग्यू दिवस : भारतातील शहरे डेंग्यूची हॉटस्पॉट

नवी दिल्ली (दै. संध्या) :



मान्सूनपूर्व प्रतिबंधात्मक उपक्रमांना सुरुवात करताना दरवर्षी १६ मे रोजी देशभरात राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो. डेंग्यूला प्रतिबंध करण्यासाठी व्यक्ती, कुटुंबे आणि समुदाय या सर्वांकडून सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते, याचे हे एक स्मरण असते. यंदा वाढते तापमान आणि बदलत्या हवामनामुळे संपूर्ण भारतात डेंग्यूचा धोका अधिक आहे. त्यामुळे हे स्मरण पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते.

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) असा अंदाज वर्तवला आहे की, २०२६ मध्ये देशाच्या मोठ्या भागांमध्ये सामान्यपेक्षा जास्त तापमान आणि उष्णतेच्या लाटेचे अधिक दिवस अनुभवायला मिळतील. त्यामुळे हे वर्ष आतापर्यंतच्या सर्वात उष्ण वर्षांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. जगभरातील शास्त्रज्ञांनी असा इशाराही दिला आहे की एल निनोसारख्या हवामान पद्धतींमुळे तीव्र हवामान घटना अधिक घतक होऊ शकतात आणि रोगराईचा धोका वाढेल. अशा परिस्थितीमुळे डेंग्यूचा धोका वाढण्याची शक्यता

आहे, कारण जास्त तापमानामुळे कीटकजन्य रोगांच्या प्रसारासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते. त्याचा परिणाम म्हणून भारतीय शहरे डेंग्यूच्या प्रसारासाठी प्रमुख हॉटस्पॉट म्हणून उदयास येत आहेत.

डेंग्यू आता केवळ पावसाळ्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर ती आता वर्षभरातील सार्वजनिक आरोग्यासाठी चिंतेची बाब बनली आहे. पारंपरिक हंगामी उच्चांकानंतरच्या काळातही रुग्ण आढळून येत आहेत. वेगाने होणारे शहरीकरण, वाढते तापमान आणि बदलणारे हवामान डेंग्यूच्या प्रसाराला गती देत आहेत. याव्यतिरिक्त लोकसंख्येची उच्च घनता, अनियोजित बांधकाम आणि पाणी साठवण्याच्या पद्धती यांसारखे घटक डासांच्या प्रजननासाठी आदर्श परिस्थिती निर्माण करत आहेत.

## HP India : नवीन उत्पादने आणि सोल्यूशन्सचे अनावरण

नवी दिल्ली (दै. संध्या) :



भारतातील तंत्रज्ञान क्षेत्राला नवी दिशा देत HP India ने २० हून अधिक नवीन उत्पादने आणि सोल्यूशन्सचे अनावरण केले आहे. गुरुग्राम येथे आयोजित कार्यक्रमात कंपनीने वैयक्तिक संगणन, प्रिंटिंग आणि कर्मचारी-केंद्रित एआय सोल्यूशन्सचा व्यापक पोर्टफोलिओ सादर केला. विद्यार्थी, व्यावसायिक, लघुउद्योग आणि उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजांना लक्षात घेऊन ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, भारतात प्रथमच एचपीने 'ओम्नीपॅड १२' या टॅब्लेट-पीसी श्रेणीत प्रवेश केला असून 'एलिटबोर्ड जी१ए नेक्स्ट जेन एआय पीसी' या जगातील पहिल्या एआय कीबोर्ड पीसीचेही सादरीकरण केले आहे.

एचपी इंडिया, श्रीलंका आणि बांगलादेशच्या वरिष्ठ उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक इप्सिता दासगुप्ता यांनी सांगितले की, भारतात तंत्रज्ञानाचा स्वीकार झपाट्याने वाढत असून शिक्षण, व्यवसाय आणि रोजगाराच्या पद्धती बदलत आहेत. या पार्श्वभूमीवर एचपी अधिक कनेक्टेड, स्मार्ट आणि वापरकर्ता-केंद्रित तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यावर भर देत आहे.

एचपी ओम्नीपॅड १२ हे या घोषणांमधील प्रमुख आकर्षण ठरले. टॅब्लेटची लवचिकता आणि पीसीसारखी उत्पादकता यांचा संगम असलेले हे उपकरण विद्यार्थ्यांसाठी आणि प्रथमच तंत्रज्ञान वापरणाऱ्यांसाठी उपयुक्त मानले जात आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांशी चर्चेनंतरच परांजपे यांचा पक्ष प्रवेश

मुंबई (दै. संध्या) :

■ शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील वादाच्या बातम्या निराधार

■ शिवसेना नेते व मंत्री उदय सामंत यांचे स्पष्टीकरण



**इंधन बचतीसाठी ईव्हीचा वापर वाढवला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांनी सर्व मंत्र्यांना काटकसरीचे आदेश दिले होते. उद्योग विभागानेही ईव्ही वाहनांचा वापर वाढवला असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

माजी खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांचा शिवसेनेतील पक्ष प्रवेश हा राष्ट्रवादी काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा केल्यानंतर झाला आहे, असे प्रतिपादन शिवसेना नेते व मंत्री उदय सामंत यांनी आज केले. परांजपे यांच्या पक्ष प्रवेशानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद निर्माण करणाऱ्या बातम्या निराधार असल्याचे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मंत्री उदय सामंत म्हणाले की, महायुतीत मित्र पक्षांनी युती धर्माचे पालन करावे, असे सामंजस्याने ठरले आहे. मात्र एखादा पदाधिकारी स्वतःहून पक्ष सोडणार असेल तर त्याने महायुतीतच राहावे ही आमची जबाबदारी आहे. परांजपे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्यांना स्वगृही परतण्याचे आवाहन केले होते. मुख्य नेते एकनाथजी शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या नेतृत्वावर प्रभावित होत परांजपे यांनी तो निर्णय घेतला, असे मंत्री सामंत म्हणाले. ते पुढे म्हणाले की परांजपे यांचा डीएनए शिवसेनेचाच असल्याने ते स्वगृही परतले. परांजपे यांनी पक्ष प्रवेशावेळी त्यांची भूमिका स्पष्ट केली होती. परांजपे यांच्या शिवसेना प्रवेशानंतर काही लोक संभ्रम निर्माण करत आहेत, जो निराधार आहे, असे ते म्हणाले.

मंत्री उदय सामंत म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमचा मित्र पक्ष आहे. परांजपे यांच्या पक्ष प्रवेशापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे सचिव जय पवार यांच्याशी चर्चा केली आणि त्यांना परांजपे यांच्या पक्ष प्रवेशाबाबत कल्पना दिली. परस्पर चर्चेनंतरच परांजपे यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश झाला, असे मंत्री सामंत म्हणाले. परांजपे यांनीही कुठेही राष्ट्रवादी नेतृत्वावर नाराजी किंवा टीका केलेली नाही. त्यामुळे परांजपे यांच्या पक्ष प्रवेशामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न निराधार असल्याचे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.


**बारामती नगरपरिषद बारामती**

दुरध्वनी क्र. (02112) 222494, फैक्स नं. (02112) 222307

Mail Id - baramatinp@gmail.com

बारामती नगरपरिषद, बारामती
बानप/कार्या १५/११६८/२०२६
दिनांक १५/०५/२०२६

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधिताना या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील मौजे तांदूळवाडी येथील गट नं. ३६६ पैकी मधील क्षेत्र ४६००.०० चौ.मी. ही मिळकत विनायक लक्ष्मण बेलदार यांचे मालकीची असून सदर मिळकत बारामती नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेनुसार ३०.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यामध्ये क्षेत्र १८९८.०० चौ.मी. ने बाधित होत आहे. सदर क्षेत्र उपअधिक्षक भूमि अभिलेख बारामती यांचेकडील मोजणी नकाशा मो.र.नं. ०२७११६/२०२५, दिनांक १३/०८/२०२५ वर दर्शविण्यात आलेले आहे.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी उपरोक्त रस्ता आरक्षणाने बाधित क्षेत्र १८९८.०० चौ.मी. जागेच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क दाखल (टी.डी.आर.) मिळणेकामी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी बारामती नगरपरिषदेकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

मिळकतीचे वर्णन - बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील मौजे तांदूळवाडी येथील गट नं. ३६६ पैकी मधील क्षेत्र विनायक लक्ष्मण बेलदार यांचे मालकीचे असून मंजूर विकास योजनेनुसार ३०.०० मीटर रुंद रस्ता याने बाधित क्षेत्र १८९८.०० चौ.मी. ने बाधीत होत आहे.

**त्याची चतुःसीमा खालीलप्रमाणे**

पूर्वेसः गट नंबर ३६५ पैकी मधील उर्वरीत क्षेत्र
दक्षिणेसः गट नंबर ३६६ पैकी मधील उर्वरीत क्षेत्र
पश्चिमेसः गट नंबर ३७० पैकी मधील उर्वरीत क्षेत्र
उत्तरेसः ३० मीटर रुंद विकास योजना रस्ता

उपरोक्त उल्लेख केलेल्या विद्यमान मालक यांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची तसेच त्यांना हस्तांतरणीय विकसन हक्क (टीडीआरसी) प्राप्त करुन घेण्याचे हक्क व अधिकार असल्याबाबत, सदर मिळकत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नाही तसेच त्यावर जप्ती अगर मनाईचा हुकूम नसल्याबाबत खात्री व भरंवसा आम्हास दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लीज, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, अपिल, कूळ, खंड, साठेखत, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती यांचेकडे समक्ष येऊन मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी. येणेप्रमाणे मुदतीत आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असल्याचे समजण्यात येऊन बारामती नगरपरिषदे तर्फे सदर मिळकतीच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकसन हक्क दाखला (टीडीआरसी) प्रस्तावधारक विनायक लक्ष्मण बेलदार यांचे नावे देण्यात येईल व सदरची जमीन नगरपरिषद ताब्यात घेईल. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
(पंकज अनिल भुसे)
मुख्याधिकारी गट-अ
बारामती नगरपरिषद, बारामती



**बारामती नगरपरिषद बारामती**

दुरध्वनी क्र. (02112) 222494, फैक्स नं. (02112) 222307

Mail Id - baramatinp@gmail.com

बारामती नगरपरिषद, बारामती
बानप/कार्या १५/११६७/२०२६
दिनांक १५/०५/२०२६

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधिताना या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील मौजे तांदूळवाडी येथील गट नं. ३६४ पैकी मधील क्षेत्र ६२००.०० चौ.मी. ही मिळकत सोनाली विनायक बेलदार यांचे मालकीची असून सदर मिळकत बारामती नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेनुसार ३०.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यामध्ये क्षेत्र १५३२.०० चौ. मी. ने बाधित होत आहे. सदर क्षेत्र उपअधिक्षक भूमि अभिलेख बारामती यांचेकडील मोजणी नकाशा मो.र.नं. ०२७११६/२०२५, दिनांक १३/०८/२०२५ वर दर्शविण्यात आलेले आहे.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी उपरोक्त रस्ता आरक्षणाने बाधित क्षेत्र १५३२.०० चौ.मी. जागेच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क दाखल (टी.डी.आर.) मिळणेकामी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी बारामती नगरपरिषदेकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

मिळकतीचे वर्णन - बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील मौजे तांदूळवाडी येथील गट नं. ३६४ पैकी मधील क्षेत्र सोनाली विनायक बेलदार यांचे मालकीचे असून मंजूर विकास योजनेनुसार ३०.०० मीटर रुंद रस्ता याने बाधित क्षेत्र १५३२.०० चौ.मी. ने बाधीत होत आहे.

**त्याची चतुःसीमा खालीलप्रमाणे**

पूर्वेसः गट नंबर ३७० पैकी मधील उर्वरीत क्षेत्र
दक्षिणेसः गट नंबर ३६४ पैकी मधील उर्वरीत क्षेत्र
पश्चिमेसः गट नंबर ३६३ पैकी मधील उर्वरीत क्षेत्र
उत्तरेसः गट नंबर ३६४ पैकी मधील उर्वरीत क्षेत्र

उपरोक्त उल्लेख केलेल्या विद्यमान मालक यांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची तसेच त्यांना हस्तांतरणीय विकसन हक्क (टीडीआरसी) प्राप्त करुन घेण्याचे हक्क व अधिकार असल्याबाबत, सदर मिळकत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नाही तसेच त्यावर जप्ती अगर मनाईचा हुकूम नसल्याबाबत खात्री व भरंवसा आम्हास दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लीज, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, अपिल, कूळ, खंड, साठेखत, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती यांचेकडे समक्ष येऊन मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी. येणेप्रमाणे मुदतीत आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असल्याचे समजण्यात येऊन बारामती नगरपरिषदे तर्फे सदर मिळकतीच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकसन हक्क दाखला (टीडीआरसी) प्रस्तावधारक सोनाली विनायक बेलदार यांचे नावे देण्यात येईल व सदरची जमीन नगरपरिषद ताब्यात घेईल. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
(पंकज अनिल भुसे)
मुख्याधिकारी गट-अ
बारामती नगरपरिषद, बारामती

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पवना धरण वाचवा! मुरूम माफियांवर MCOCA लावा!

पिंपरी-चिंचवड (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून रात्री 11 ते पहाटे 5 या वेळेत 50 पेक्षा अधिक हायवा डंपरद्वारे अवैध मुरूम व मातीचे उत्खनन सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी शिवशाही व्यापारी संघाचे संस्थापक अध्यक्ष युवराज दाखले यांनी केली आहे. "पवना धरण हे लाखो नागरिकांची जीवनवाहिनी आहे. याच धरणाच्या काठावरून JCB-पोकलेन लावून 20-30 फूट खोल खड्डे खणून मुरूम चोरला जात आहे. विना नंबर प्लेटच्या हायवा ट्रक गेव्हाण खडक, चांदेवाडी, ठाकूरसाई, ब्राह्मोली, कोथुर्णे, शिवली मार्गे चांदखेडकडे जातात. स्थानिक महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे शक्य नाही," असा गंभीर आरोप युवराज दाखले यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्रजी व महसूल मंत्री बावनकुळे साहेब, पवना वाचवा. 7 दिवसांत कारवाई न झाल्यास शिवशाही व्यापारी संघ, व शेतकरी मिळून मंत्रालयासमोर ठिय्या देऊ. मुरूम माफियांना मावळातून हद्दपार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही," असा सज्जड इशारा युवराज दाखले यांनी दिला आहे.




### निगडी प्राधिकरणात परिचारिका दिन उत्साहात साजरा

निगडी (दैनिक संध्या) : दिनांक १४ मे २०२६ रोजी प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ व मधुमेह संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने तुकाराम उद्यानातील सभागृहात परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला.मा. डॉक्टर राकेश पाटील अस्थिरोग तज्ञ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाल्यानंतर सौ आशा नष्टे यांनी "हीच अमुची प्रार्थना " सादर केली. यावेळेस सर्व परिचारिका हातात मेणबत्ती घेऊन कोरस देत उभ्या होत्या. प्रमुख अतिथी तसेच दोन्ही अध्यक्षांचा यावेळी भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. मधुमेह संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर दिगंबर इंगोले यांनी प्रस्तावना व ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सौ शुभदा मेंगळे यांनी अतिथींचा परिचय करून दिला. डॉक्टरांनी ज्येष्ठामध्ये होणारी हाडांची झीज, सांधेदुखी, गुडघेदुखी व त्यावर प्रतिबंध उपाय व झाल्यानंतर पुढील उपाययोजना याबाबतची माहिती दिली.तसेच ज्येष्ठांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही सविस्तर दिली. सौ आशा नष्टे यांनी प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघाला दिलेल्या पंचवीस हजार रुपयांच्या देणगीच्या व्याजातून परिचारिकांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सौ आशा नष्टे,माधुरी डिसोजा, विभावरी कोटस्थाने,पुष्पांजली सूर्यवंशी,पुष्पा लंके,अंजली कुलकर्णी,वत्सला वाघचौरे या परिचारिकांचा समावेश होता. सर्वांनी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त केले. डॉक्टर ज्योती इंगोले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले .श्री नरेंद्र मिसाळ यांनी आभार मानले यावेळी माननीय नगरसेविका सौ शैलाताई मोरे, सर्व संघातील आजी-माजी अध्यक्ष व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. संघाची प्रार्थना व चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### बचत गट महिलांकडून घरोघरी 5 लाखांहून अधिक मालमत्ता कर बिलांचे वितरण

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर संकलन मोहीम सुरू असून, शहरातील मालमत्ताधारकांना महिला बचत गटांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मालमत्ता कर बिलांचे वितरण करण्यात येत आहे. निवासी, बिगर निवासी, औद्योगिक तसेच इतर मालमत्ताधारकांना प्रत्यक्ष भेट देत बचत गटातील महिलांकडून आतापर्यंत ५ लाख ९ हजार ७४७ इतक्या मालमत्ता कर बिलांचे वितरण करण्यात आले आहे. महापालिकेच्या वतीने नागरिकांना वेळेत मालमत्ता कर भरून विविध सवलतींचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. विशेषतः ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरल्यास १० टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असल्याने नागरिकांनी या सुविधेचा त्वरित लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. १ एप्रिल २०२६ ते १२ मे २०२६ या कालावधीत महिला बचत गटांकडून एकूण ५ लाख ९ हजार ७४७ मालमत्ता कर बिलांचे वितरण करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहरात सध्या ७ लाख ६६ हजार ३८५ मालमत्तांची नोंद असून, त्यापैकी आतापर्यंत १ लाख ५३ हजार ९०२ मालमत्ताधारकांनी कर भरला आहे. यामधून महापालिकेला १४८ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला असून, ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या उन्हाळ्याचे तीव्र तापमान व उष्माघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेता घराबाहेर पडण्याचा त्रास टाळण्यासाठी नागरिकांनी मालमत्ता कर भरण्यासाठी ऑनलाइन पद्धतीचा अवलंब करावा. ऑनलाइन कर भरणे सुरक्षित, जलद व सुलभ असून घरबसल्या काही मिनिटांत कर भरता येतो. यामुळे रांगेत उभे राहण्याचा त्रास टाळता येतो तसेच वेळेची बचत होते. विशेष म्हणजे ऑनलाइन पद्धतीने कर भरल्यास सवलतींचाही लाभ मिळतो. त्यामुळे नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त वापर करून वेळेत मालमत्ता कर भरावा. तसेच, ज्या मालमत्ताधारकांना अद्याप ऑनलाइन अथवा घरपोच स्वरूपात बिल प्राप्त झाले नसेल, त्यांनी संबंधित कर संकलन विभाग कार्यालयाशी संपर्क साधून बिल प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. मालमत्ता कर थकबाकीदारांना वितरित करण्यात येणाऱ्या प्रत्येक बिलासोबत जप्तीपूर्व नोटीसही देण्यात येत आहे. आतापर्यंत २४ हजार ६२६ थकबाकीदार मालमत्ताधारकांना नोटीस बजावण्यात आली असून, संबंधितांनी तात्काळ थकबाकीसह चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




# ‘हायकमांड’च्या अक्षम्य दुर्लक्षामुळेच काँग्रेसची वाताहात

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवडच्या विकासाची खऱ्या अर्थाने पायाभरणी करणाऱ्या काँग्रेस पक्षाने वर्षानुवर्षे महापालिकेवर निर्विवाद सत्ता गाजवली. तरीही राजकीय बालेकिल्ला असलेल्या या शहरात स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी काँग्रेसला आज झगडावे लागते आहे. एकहाती सत्ता ते शून्य नगरसेवक अशी उतरती कळा लागणे, निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारही न मिळणे, संघटना कोलमडणे, अशी वाताहात होण्यामागे पक्षातील अंतर्गत लाथाळ्या, गटबाजीचे राजकारण आणि स्थानिक नेतृत्वाइतकेच पक्षाच्या ‘हायकमांड’चे अक्षम्य दुर्लक्ष जबाबदार असल्याची तीव्र भावना काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आहे.

काँग्रेस आणि पिंपरी-चिंचवड शहर हे अतूट समीकरण आहे. आजमितीला पिंपरी-चिंचवडला जे वैभव प्राप्त झाले, नावलौकिक मिळाला आहे. शहराची विकासात्मक जडणघडण झाली, त्याची पायाभरणी काँग्रेस पक्षामुळे झाली आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही. सद्यस्थितीत शहर पातळीवर काँग्रेस पक्ष औषधालाही शिल्लक राहिलेला नाही, ही वस्तुस्थिती लपवता येणार नाही. वर्षानुवर्षे पिंपरी-चिंचवडचे सत्ताकारण ज्या काँग्रेस पक्षाभोवती केंद्रीत होते. महापालिकेत निर्विवाद सत्ता होती. महत्त्वाची सगळीचं पदे काँग्रेसकडे होती. अशा ताकतीच्या राष्ट्रीय पक्षाची अवस्था आज दयनीय आहे. १२८ सदस्यसंख्या असलेल्या पालिकेत काँग्रेसला एकही नगरसेवक निवडून आणता आला नाही. पक्षसंघटना पूर्णपणे विस्कळीत आहे. पक्षाचे उरले-सुरले अस्तित्व टिकवण्यासाठी निष्ठावान कार्यकर्ते जीवाचे रान करत आहेत.

शहर काँग्रेसची झालेली दुरवस्था एकाच दिवसात झालेली नाही. टप्याटप्प्याने पक्षाला उतरती कळा लागली. त्या-त्या वेळी



उपाययोजना होणे गरजेचे होते, ती झाली नाही. काँग्रेस ‘हायकमांड’ने कधीही पिंपरी-चिंचवडकडे लक्ष दिले नाही. परिणामी, काँग्रेसचे न भरून येणारे नुकसान होतच राहिले. प्रचंड जनाधार असलेला, निष्ठावान कार्यकर्त्यांचे मोठे जाळे असलेला हा पक्ष राजकीयदृष्ट्या शक्तीहीन बनला.

एकत्रित पक्ष होता, तोपर्यंत काँग्रेसचा बोलबोला होता. १० जून १९९९ रोजी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. त्यातून पुढे राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि अजितदादा पवार यांच्या प्रभावामुळे काँग्रेस नेते आणि कार्यकर्त्यांचा मोठा गट राष्ट्रवादीत गेला. दुसरीकडे, अशा कठीण प्रसंगातही प्रा. रामकृष्ण मोरे यांनी शर्थीचे प्रयत्न करून पक्षाचा बालेकिल्ला सांभाळला. मोरे यांच्या समन्यायी नेतृत्वावर विश्वास ठेवून असंख्य कार्यकर्ते काँग्रेस पक्षातच राहिले. तत्कालीन परिस्थितीत राष्ट्रवादीचे पारडे जड होते. मात्र, राजकारणातील प्रदीर्घ अनुभव असलेल्या मोरे यांनी पवारांच्या राजकारणाला काटशह देत शहर काँग्रेसची गळती थांबवली.

विभाजनानंतर २००२ च्या महापालिका निवडणुकीत प्रथमच दोन्ही काँग्रेस आमने-सामने लढले. तेव्हा रंगलेला राजकीय सामना एकतर्फी न होता, बरोबरीत सुटला. पिंपरी पालिकेतील १०५ पैकी ३२ जागांवर काँग्रेसला यश मिळाले. प्रा. मोरे यांनी केलेली योग्य उमेदवारांची निवड आणि नियोजनबध्द प्रचारयंत्रणा हे त्यामागचे कारण होते.

त्यामुळे ३६ जागा जिंकणाऱ्या राष्ट्रवादीला पालिका ताब्यात घेण्यासाठी काँग्रेस पक्षाला बरोबर घ्यावेच लागले आणि सत्तेतील निम्मा वाटाही द्यावा लागला. नंतर, नोव्हेंबर २००३ मध्ये प्रा. मोरे यांचे निधन झाले. त्यानंतर, पुण्याचे खासदार सुरेश कलमाडी यांनी काही महिने व मंत्री असलेल्या हर्षवर्धन पाटील, पतंगराव कदम यांच्याकडे काही काळ नेतृत्वाची धुरा होती. मात्र, त्यांचे नेतृत्व स्थिरावले नाही आणि स्थानिक पातळीवर कोणी ते स्वीकारलेही नाही.

या काळात महापालिकेचा कारभार पूर्णपणे अजितदादांच्या हातात आला होता. त्यांच्या झंझावातापुढे काँग्रेस नेत्यांचा निभाव लागला नाही. प्रदेश स्तरावरील काँग्रेस नेत्यांनी इथे लक्ष घालून अजितदादांशी संघर्ष करण्याचा प्रयत्नही केला नाही. पिंपरी-चिंचवड शहरात पक्षाची काय हाल-हवा आहे, याची चौकशी काँग्रेस नेतृत्वाने कधी केली नाही. ताकद देणे तर खूप दूरची गोष्ट होती. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला. २००२ मध्ये असलेली नगरसेवकांची ३२ ही संख्या २००७ मध्ये १९ झाली. २०१२ च्या निवडणुकीत १२८ पैकी १४ नगरसेवक निवडून आले. सर्वात वाईट स्थिती म्हणजे २०१७ आणि २०२६ च्या पालिका निवडणुकीत १२८ पैकी एकही जागा जिंकता आली नाही. या दोन्हीही निवडणुकीत काँग्रेसला उमेदवार देखील मिळत नव्हते. त्यामुळे पूर्ण जागा लढवता आल्या नाहीत.

## प्रभाग क्र.१६ साईनगर फॉरेस्ट परिसरात ‘ऑक्सिजन पार्क’ उभारण्यात येणार

पिंपरी (दै. संध्या)

रावेत प्रभाग क्रमांक १६ मधील साईनगर फॉरेस्ट रोड परिसराचा विकास आणि पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून, येथे लवकरच ‘ऑक्सिजन पार्क’ विकसित करण्याची तयारी सुरू झाली आहे. शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी याकरिता सातत्याने पाठपुरावा केला आहे. यासंदर्भात आज वनपरिक्षेत्र अधिकारी (फॉरेस्ट ऑफिसर) भांबुर्डा तथा सदस्य सचिव नागरी संयुक्त वन व्यवस्थापन समिती, पुणे यांच्या समवेत सकारात्मक बैठक पार पडली.

या बैठकीत साईनगर फॉरेस्ट परिसरातील महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. विशेषतः फॉरेस्ट रोड



परिसरात स्ट्रीट लाईट पोल बसविणे, नागरिकांसाठी सुरक्षित पायवाटा तयार करणे तसेच भविष्यात विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक आश्वासन दिले. या उपक्रमामुळे साईनगर परिसरातील नागरिकांना हरित व सुरक्षित वातावरण मिळण्यास मदत होणार असून, परिसराचे सौंदर्यीकरण आणि पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळणार आहे. नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी सांगितले की, “साईनगर परिसराचा विकास, महिलांची सुरक्षितता आणि पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार आहे.”

## ‘वायसीएम’मधील आरोग्य सुविधांचा दर्जा उंचावणार; स्थायी सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून रुग्णालयाची पाहणी

पिंपरी (दै. संध्या)

यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी आज रुग्णालयाचा सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करत त्रुटी दूर करून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. अभिषेक बारणे यांनी रुग्णालयातील सर्व संबंधित विभाग प्रमुख आणि अधिकाऱ्यांच्या समवेत ४ थ्या मजल्यावरील वॉर्डची सविस्तर पाहणी केली. यावेळी रुग्णांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेताना त्यांनी वॉर्डातील अत्यावश्यक सोयी, वैद्यकीय उपकरणांची



स्थिती आणि लिफ्टच्या वारंवार उद्भवणाऱ्या समस्यांची दखल घेतली. लिफ्ट दुरुस्तीबाबत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता, याबाबत तातडीने कार्यवाही करून रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय टाळण्याचे आदेश त्यांनी दिले.

रुग्णालयावर वाढणारा रुग्णांचा भार विचारात घेता, परिसरातील मोकळ्या जागेचा प्रभावी वापर करण्याबाबतही यावेळी चर्चा झाली. या जागेत इमारतींचा विस्तार करून नवीन आरोग्य सेवा सुरू करण्याच्या शक्यता त्यांनी पडताळून पाहिल्या. रुग्णालयातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी टॉयलेट स्वच्छता, बेडची व्यवस्था आणि सुरळीत पाणीपुरवठा यांवर विशेष लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विद्युत विभाग आणि अग्निशमन यंत्रणेची सुरक्षाविषयक मानके तपासून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

## पिंपरी-चिंचवड स्थायी समितीचे महत्त्वाचे निर्णय

### संरक्षण विभाग करारास मंजुरी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपळे सौदागर येथे संरक्षण विभागाच्या जागेत 18 मीटर रुंदीचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. त्या जागेच्या बदल्यात संरक्षण विभागाला विविध ठिकाणी निवासी सदनिका महापालिका मोफत बांधून देणार आहे. त्यासाठी सल्लागार नियुक्तीसह मान्यता देण्यात आली आहे.

विविध विकासकामांच्या खर्चाना स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. स्थायी समिती सभा समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार (दि.13) झाली.

सभेला समिती सदस्यांसह आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, नगर सचिव मुकेश कोळप व अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेने संरक्षण विभागाचा जागा ताब्यात घेत पिंपळे सौदागर येथील सर्व्हे क्रमांक 30, 32, 33, 34, 37, 38 आणि 39 येथे 18 मीटर रुंदीचे रस्ते विकसित केले आहे. त्यासंदर्भात महाालिकेने संरक्षण विभागासोबत करार केला आहे. त्यानुसार जागेच्या बाजारभावानुसार असलेल्या मूल्याच्या बदल्यात महापालिका संरक्षण विभागास निवासी सदनिका बांधून देणार आहे.

संरक्षण विभागाच्या खडकी येथील स्टेशन मुख्यालयाने घोरपडी, खडकी व औंध येथे निवासी सदनिका बांधून देण्याची मागणी महापालिकेकडे केली आहे. त्याचा आराखडा तसेच, अंदाजपत्रक, बांधकाम परवानगी व निविदा प्रकिया आदी कामासाठी



प्रत्यक्ष खर्चाच्या 1.93 टक्के शुल्क दराने एनव्हायरोसेफ कन्सल्टंट हा सल्लागार थेट पद्धतीने नेमण्यात आला आहे.

मेट्रोला 50 कोटी रुपयांचा निधी देण्याचा विषय पुन्हा तहकूब करण्यात आला. महामेट्रोकडून निगडी ते चिंचवडचे रस्ते व्यवस्थित दुरूस्त करण्यात आलेले नाही. पुढील बैठकीत मेट्रोच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. दुरूस्ती काम तातडीने पूर्ण करण्यासाठी मेट्रो व्यवस्थापनाला पत्र देण्यात येणार आहे, असे अध्यक्ष बारणे यांनी सांगितले.

काळेवाडी येथील ज्योतिबा उद्यानात 25 लाख 4 हजार रुपये खर्च करून कुस्तीचा आखाडा उभारण्यात येणार आहे. पिंपळे निलख येथील सर्व्हे क्रमांक 28 मध्ये महिला बाजार हट केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 34 लाख 41 हजार खर्च अपेक्षित आहे.

## विकासकामाच्या नावाखाली ठेवी मोडण्याचा घाट?

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक स्थिती डबघाईस आली आहे. त्यामुळे नवीन कामे व प्रकल्प कशी करायचे, यांची चिंता सत्ताधाऱ्यांना सतावत आहे. विकासकामांच्या नावाखाली महापालिकेच्या ठेवी मोडण्याचा घाट घातला जात आहे. तसेच, मोठ्या प्रकल्पांसाठी कर्ज काढण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. महापालिकेवर 4 हजार 500 कोटी रुपयांची देणी आहेत. सुरू असलेली मोठ्या खर्चिक कामांची बिले अदा करण्यात महापालिकेचे सर्वाधिक उत्पन्न खर्ची पडणार आहे. त्यामुळे नवीन कामांसाठी महापालिकेकडे पुरेसा निधी नाही. प्रभागात कामे करण्यासाठी पदाधिकारी व नगरसेवकांना निधीची तरतूद नसल्याचे कारण अधिकाऱ्यांकडून कानी पडत आहेत. त्यामुळे कामे कशी करायची, असा प्रश्न नगरसेवकांसमोर निर्माण झाला आहे. महापालिकेच्या एकूण 5 हजार 768 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. त्यातील सर्वसाधारण निधी 1 हजार 550 कोटी रुपये इतका आहे. तर, उर्वरित 4 हजार 218 कोटी रुपयांच्या ठेवी राखीव आहेत. सर्वसाधारण निधीच्या 1 हजार 550 कोटी रुपयांच्या ठेवी विकासकामांच्या नावाखाली मोडण्याच्या हालचाली सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येत आहे. अत्यावश्यक कामे व प्रकल्पांसाठी सर्वसाधारण निधीच्या ठेवी मोडता येतात. त्या काही नवीन नाही, असे पदाधिकाऱ्यांचे मत आहे. सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन तो निधी वापरण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्यामुळे महापालिकेच्या ठेवीही मोडल्या जाऊन महापालिकेच्या आर्थिक कणा मोडला जाऊ शकतो.

# भाडोत्री गाड्यांवर पालिकेची उधळपट्टी? पंतप्रधानांकडून इंधन बचतीचे आवाहन

## मात्र पिंपरी-चिंचवड महापालिकेचा भाडेतत्त्वावरील वाहनांवर लाखोंचा खर्च

पिंपरी (दै. संध्या)

आखातातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि ऊर्जा संवर्धनाचे आवाहन केले आहे. मात्र पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भाडेतत्त्वावरील वाहनांचा वाढता ताफा आणि त्यावरील लाखोंचा खर्च गंभीर चर्चेचा विषय बनला आहे.

महापालिकेच्या विविध विभागांसाठी चारचाकी गाड्या, एसयूव्ही, बोलेरो पिकअप, जेमिनी ट्रक, वॉटर टँकर, हायड्रॉलिक लॅडर, पशुरुग्णवाहिका यांसारखी वाहने भाड्याने घेण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, सामान्य नागरिकांना इंधन बचतीचे धडे देणारे प्रशासन स्वतः मात्र वाहन वापरात कोणतीही काटकसर करताना दिसत नाही.

अधिकारी, विभागप्रमुख आणि लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वाहनांचा वापर आता गरजेपेक्षा प्रतिष्ठेचा विषय बनल्याची टीका होत आहे. अनेकदा एकाच कामासाठी दोन-दोन वाहने वापरली जात असल्याचे, तर काही वाहने दिवसभर कार्यालयाबाहेरच उभी राहत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, प्रवासासाठी खासगी वाहनांचा वापर न करता, मेट्रोचा वापर करण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत पदाधिकारी अधिकारी खासगी वाहनांचा वापर कमी करतील, मेट्रोने किंवा इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देतील, अशी अपेक्षा होत आहेत. विविध विभागांकडे सध्या शंभरावर वाहने कार्यरत आहेत. त्यामध्ये ५९ इंधनावरील चारचाकी, ५८ ईव्ही चारचाकी, २३ जेमिनी ट्रक, १७ बोलेरो पिक-अप, ६३ वॉटर टँकर, तसेच हायड्रॉलिक लॅडर आणि विशेष उपयोगाची वाहने यांचा समावेश आहे. काही वाहनांसाठी प्रतिमहिना ४० ते ५० हजार रुपये, तर काहींसाठी प्रतिदिन हजारो रुपयांचा भाडेकरार करण्यात आला आहे. इंधन, चालक, देखभाल आणि अतिरिक्त भत्तेही दिले जात असल्याने हा खर्च कोट्यवधीवर गेला आहे.

अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना आठवड्यातून किमान एक दिवस पीएमपी बस, मेट्रो किंवा सायकलचा वापर सक्तीचा केला जाणार का? विभागनिहाय वाहन वापराचे ऑडिट होणार का? अनावश्यक भाडेतत्त्वावरील वाहने कमी केली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे सध्या तरी प्रशासनाकडे नाहीत.

माजी आयुक्त शेखर सिंह यांनी पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी सुरू केलेला ‘सायकल डे’ उपक्रम आता पूर्णपणे बंद आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सायकलने कार्यालयात यावे, वाहतुकीवरील ताण कमी व्हावा आणि इंधन बचतीचा संदेश जावा, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. मात्र तो केवळ फोटोपुरता मर्यादित राहिला.

### महापौर परदेश दौऱ्यावर

महापौर रवी लांडगे लवकरच वर्ल्ड अर्बन फोरम-१३ परिषदेसाठी अझरबैजानमधील बाकू येथे जाणार आहेत. या दौऱ्याचा खर्च किती होणार? तो कोणत्या निधीतून केला जाणार आणि त्यातून शहराला नेमका काय फायदा होणार, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. देशातील स्थिती लक्षात घेता महापौर हा दौरा रद्द करतात का, याकडे आता शहराचे लक्ष आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापौर मल्लखांब चषक स्पर्धेत शिवजीत संतोष वळकुंदे ने पटकावले भरघोस बक्षीस

बारामती (दैनिक संध्या) : ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानगर, बारामती येथे शारदा स्पोर्ट्स क्लब ची स्थापना संस्थेचे चेअरमन मा राजेंद्र पवार यांच्या संकल्पनेतुन करण्यात आली.त्यामुळे तालुका स्तरावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुविधा बारामती येथील नागरिकांना मिळत आहेत त्यात अद्यावत जलतरण तलाव,व्यायामशाळा, हॉकी,फुटबॉल चा लाभ तरुणवर्ग घेताना दिसत आहे.या सुविधेचे यश अधोरेखित करताना आजपर्यंत राज्यातील तसेच संपूर्ण भारतामध्ये विद्यार्थीनी बऱ्याच मोठ्या प्रमाणात विविध खेळामध्ये आपला ठसा उमटवला आहे.पुण्याच्या महापौर मल्लखांब चषक स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील एकुण अठरा संघ आणि चोपन्न खेळाडूनी सहभाग नोंदवला होता त्यात बारामती च्या दोन मल्लखांब खेळाडूंनी दैदिप्यमान कामगिरी केली त्यात शिवाजीत संतोष वळकुंदे याने चौदा वर्षाखालील गटामध्ये गोल्ड मेडलची कमाई केली तसेच वेदांत गाढवे याने बारा वर्षाखालील गटामध्ये सिल्वर मेडल ची कमाई केली.तसेच दोघांचीही दोन्ही गटामधून बेस्ट ऑफ सिक्स मध्ये निवड झाली होती यामध्ये पुन्हा शिवजीत संतोष वळकुंदे याने विजेते पदाला गवसनी घालुन संपूर्ण स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून सर्वोत्कृष्ट खेळाडू चा बहुमान मिळवला त्या बद्दल त्यांचा सत्कार पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते पुणे येथे ट्रॉफी सन्मान चिन्ह देऊन त्याचा गौरव करण्यात आला होता.आज शिवजीत ला प्रथम क्रमांकाकरिता जाहीर झालेल्या अकरा हजार रुपयांचा धनादेश व बेस्ट ऑफ सिक्स सर्वोत्कृष्ट मल्लखांबपटूस पंधरा हजार रुपयांचा धनादेश प्राप्त झाला त्याचा सत्कार संस्थेचे आदरणीय मा.चेअरमन राजेंद्र दादा पवार यांच्या हस्ते शारदानगर येथे शिवजीत संतोष वळकुंदे याला प्रदान करण्यात आला.सदरील यश संपादन करण्यासाठी शारदानगर चे प्रशिक्षक सोमनाथ कोठावळे सर यांनी मार्गदर्शन केले.या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन मा राजेंद्र पवार,विश्वस्त सौ सुनंदा पवार,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलावडे,मानव संसाधन प्रमुख गार्गी दत्ता,समन्वयक प्रशांत तनपुरे, संतोष वाघ प्राचार्य सूर्यकांत मुंढे तसेच सर्वांनी प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.



### श्रीलंका नेपाळ आणि भारत देशातील सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

बारामती (दैनिक संध्या) : महाराष्ट्रमध्ये नाविन्यपूर्ण शेती कशा पद्धतीने केली जाते याचा अभ्यास करण्यासाठी श्रीलंकेतील 12 नेपाळ येथील 7 आणि भारत देशातील 5 सहकारी बँकेचे अधिकारी कृषी विज्ञान केंद्रात प्रशिक्षणासाठी आले होते.प्रशिक्षणाच्या उद्‌घाटन प्रसंगी संतोष गोडसे विषय विशेषज्ञ कृषी विस्तार यांनी कृषी विज्ञान केंद्रामध्ये सुरू असलेले विविध उपक्रम बाबत माहिती दिली.कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाबाबत प्रात्यक्षिक प्लॉट आणि वॉर रूम मध्ये कु. ऐश्वर्या धावने,प्रतीक गायकवाड आणि ओंकार ढोबळे यांनी या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले त्या मध्ये शेतकऱ्याच्या मोबाईल मध्ये दिसत असलेला त्याच्या शेताचा नकाशा,आर्द्रता,तापमान,कीड रोग इ. तसेच शेतकऱ्यांना जात असलेले मेसेज,अलर्ट तसेच इतर माहिती बाबत मार्गदर्शन केले.हायड्रोपोनिक तंत्रज्ञान आधारित पिकांची माहिती सौ.दिपाली पवार यांनी दिली.मिलेट प्रक्रिया व त्याचे ब्रँडिंग बाबत सुहास ननावारे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.शेततळ्यातील मत्स्यपालन बाबत चंद्रकांत दाते यांचे मार्गदर्शन झाले.उद्योजक श्री विश्वजीत वाबळे यांनी शेतीमध्ये होमिओपॅथीचा वापर आधारित मार्गदर्शन केले,कुकुटपालन आणि शेळीपालन ची ही माहिती देऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

### शिवनेरी विद्यालयाचा निकाल शंभर टक्के



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर मधील शिवनेरी विद्यालय धोलवड येथील शैक्षणिक वर्ष 2025 -26 चा दहावीचा एसएससी बोर्डाचा निकाल शंभर टक्के लागला असून तेथील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा पार पडला. अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन यांनी दिली. सलग 18 वर्ष ही परंपरा कायम राखण्यात विद्यालयाला यश प्राप्त झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयातील पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा फोल्डर फाईल, पेन आणि गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सरपंच वैभव नलावडे आणि उपाध्यक्ष भोलानाथ नलावडे यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक समीर वामन यांनी केले.कार्यक्रमास ग्राम शिक्षण सेवा मंडळाचे उपाध्यक्ष बाबाजी मुंढे, सचिव उल्हास, नलावडे नेतवडचे उपसरपंच पोपट गायकवाड ,मुख्याध्यापक समीर वामन ,विश्वस्त पांडुरंग नलावडे संजय कासार, मच्छिंद्र पवार, अविनाश वायकर विश्वास कुटे,संभाजी गायकवाड दत्ता गायकवाड, राजेंद्र गायकवाड, गणेश कुटे, नंदकुमार मोढवे, मधुकर कुटे, भगवान गायकवाड ,निवृत्ती कुटे, देविदास गायकवाड, सुधाकर नलावडे विलास नलावडे सुभाष नलावडे गुलाब पाटील नलावडे,सोपान नलावडे ,खंडेराव नलावडे, पोपट नलावडे ,मनोज दिघे, शशिकांत मुंढे ,प्रतीक नलावडे, मिलिंद नलावडे, सुरेश नलावडे, देवराम कुटे, विमल गायकवाड, शैला कुटे, सुनंदा कुटे,शितल गायकवाड, सोनाबाई वाघमारे,अशोक गायकवाड ,विश्वास गायकवाड, सुरेखा पानसरे ,हिरा कुटे यांसह अनेक पालक विद्यार्थी उपस्थित होते.

# पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी नंदकुमार सागर यांच्या नावाची चर्चा

## विविध संघटनांचा पाठिंबा



**जेजुरी (दै. संध्या)**

“संघटना हे समाजजीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी संघटित प्रयत्न आवश्यक आहेत. विद्यार्थी, शिक्षक आणि शैक्षणिक घटकांचे हित जपण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज असून पुणे विभागातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांचे नेतृत्व प्रभावी ठरू शकते,” असे प्रतिपादन मुंबई सेकंडरी सोसायटीचे संचालक तुकाराम बेनके यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्या वतीने प्रमुख मार्गदर्शक संतोष साखरे यांना मुख्याध्यापक-शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींनी पुणे येथील भाजपा कार्यालयात विविध शैक्षणिक मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनाचा स्वीकार संतोष साखरे यांनी केला.

यावेळी पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा महासंघाचे उपाध्यक्ष तुकाराम शिरसाट, शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष रामदास थिटे, सचिव बाळासाहेब चव्हाण, संदीप जगताप, राष्ट्रपती पारितोषिक विजेते प्राचार्य कुंडलीक मेमाणे, राणी बांदल-मानकर, दत्तात्रय रोकडे, उत्तम पोटावडे, महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे निलेश काशीद, महेश शेलार, संजीव मांढरे, शिवहार लहाणे, अरविंद गवळे, प्रशमन कोल्हे, बबनराव उकीरडे, सुनिल मोरे, पुणे शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शिवाजी शिंदे, रोहीदास भारमळ, सतीश वाघमारे, विष्णू मोरे, विष्णूदास गावडे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र state मुख्याध्यापक महासंघाचे सचिव नंदकुमार सागर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न मांडले. “जुनी पेन्शन योजना त्वरित लागू करावी, अनुदान पात्र शाळांना विनाअट अनुदानाचा टप्पा मिळावा, संच मान्यतेच्या निकषांमध्ये सुधारणा व्हावी, वेतनेतर अनुदान किमान १२ टक्के द्यावे, ग्रामीण भागातील अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया रद्द करावी, पवित्र पोर्टलद्वारे १०० टक्के शिक्षक भरती वर्षातून दोनदा व्हावी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती तातडीने करावी,” अशी मागणी त्यांनी केली.

शैक्षणिक प्रश्नांवरील सखोल अभ्यास, संघटनात्मक नेतृत्व आणि शिक्षकांच्या प्रश्नांवर सातत्याने घेतलेली भूमिका यामुळे नंदकुमार सागर यांचे नेतृत्व अभ्यासू, सुसंस्कृत आणि सजग असल्याचे मत विविध पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून त्यांना संधी देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

दरम्यान, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी भारतीय जनता पक्षाकडून नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा सुरू असून इच्छुक उमेदवारांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि संघटनात्मक कार्यामुळे त्यांची उमेदवारी प्रभावी मानली जात आहे.

## चाकणला रंगरंगोटीमुळे अंगणवाडी झाली बोलकी



**चाकण (दै. संध्या)**

सेवाभावी संस्था, ग्रामस्थ, दानशूर कंपन्या आणि येथील नगरसेवकांच्या पुढाकारातून चाकण येथील नेहरू चौकातील अंगणवाडीला आकर्षक रंगरंगोटी केल्यामुळे अंगणवाडी बोलकी झाली असून, रुपडेच पालटून गेले आहे. चाकण येथील नेहरु चौकात बालकांसाठी नवयुग अंगणवाडी आहे. या अंगणवाडीला ॲटलास कॅपको व होम फॉर द चिल्ड्रेन्स यांच्याकडून रंगरंगोटी करण्यात आली. बालकांचे लक्ष वेधण्यासाठी भिंतीवर आकर्षक, सुबक रंगीत चित्र काढण्यात आली आहेत. या अंगणवाडीत सुमारे ४७ बालके शिक्षण घेत असून, मुलांना विरंगुळा वाटावा म्हणून भिंती आकर्षक पद्धतीने रंगविण्यात आल्या आहेत. प्रियंका आगरकर, संध्या नगरकर व शेख या येथे परिश्रम घेत आहेत. नेहरू चौकात अगदी मध्यवर्ती ठिकाणी बालचमुंसाठी नवयुग अंगणवाडी आहे. या अंगणवाडीत शेजारी पाजारी असणारी बालके शिक्षणासाठी त्यांचे पालक घेऊन येत असतात. त्यांना विरंगुळा वाटावा म्हणून या ठिकाणी सातत्याने छोटे छोटे उपक्रम राबवले जातात. या प्रभागाचे नगरसेवक मंगेश कांडगे, नगरसेविका अनिता घोगरे, माजी नगराध्यक्ष शेखर घोगरे आदींसह नेहरू चौकातील सर्वच ग्रामस्थांचे यासाठी विशेष सहकार्य लाभत आहे."

## रस्ता होना चाहिये मगर आंगण छोडके

**नारायणगाव (दै. संध्या)**

ग्रामपंचायत नारायणगावने काही दिवसांपूर्वीच बस स्थानक ते पूर्व वेस या रस्त्याच्या साईटपट्ट्या दुरुस्त करून खड्डे बुजवले होते. तसेच रस्त्यात येत असलेले दुकानदारांचे ओटे काढले होते. नारायणगाव ही तालुक्यातील मुख्य व मोठी बाजारपेठ असल्यामुळे तालुक्यातील सर्व ठिकाणाहून याठिकाणी खरेदीसाठी येत असतात. व आपली वाहने दुकानासमोर लावून दुकानामध्ये खरेदी करण्यासाठी जात असतात परंतु या साईडपट्ट्यांना खड्डे व अरुंद रस्ता असल्यामुळे ग्राहकांना येथे अडचण निर्माण होत होती. ग्रामपंचायतीने हा प्रश्न लक्षात घेऊन बस स्थानक ते पूर्ववेसपर्यंत च्या साईटपट्ट्याचे काम केल्यामुळे नागरिक व वाहन चालक समाधान व्यक्त करत होते.

हा रस्ता रुंद झाल्यामुळे गावात येणाऱ्या वाहनांना गाड्या लावता येत होत्या.परंतु बसस्थानकाजवळील काही दुकानदार आपल्या दुकानापुढे रस्त्यालगत माती विटा दगडाचे ढीग टाकून पुन्हा रस्त्यावर येत आहेत. त्यामुळे वाहन चालकांना व नागरिकांना पुन्हा त्रास सुरू होणार आहे. ग्रामपंचायतने या दुकानदारांना किती वेळा समज द्यावी किंवा हा राडारोडा काढून टाकावा हा एक मोठा गहण प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे ज्याने त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांचा प्रश्न लक्षात घेऊन रस्त्यात मुरूम विटा टाकू नये. असे सुज्ञ नागरिक व वाहनचालकांचे मत आहे.सध्याची परिस्थिती व लोकांची मानसिकता अशी आहे कि रस्ता होना चाहिये मगर मेरा आंगण छोडके... अशी झाली आहे.



यासंदर्भात माहिती घेतली असता बरेचशे दुकानदार म्हणाले,दुकानात येण्यासाठी ग्राहकांना पायऱ्या नसल्यामुळे अनेक दिवसांपासून दुकानांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत. तसेच दुकानासमोर रस्ता खोल असल्यामुळे पायऱ्या कराव्या लागत आहेत. या पायऱ्यांचा कोणताही अडथळा आम्ही रस्त्यावरील वाहणांना किंवा नागरिकांना होऊ देणार नाही.

## “ट्रॅक्टरच्या युगात बैलऔताच पुनरागमन!”

- ऊस बांधणीसाठी पुरंदरच्या शेतकऱ्यांची पुन्हा बैलजोडीकडे धाव
- कमी खर्च, अधिक रोजगार आणि उसालाही फायदा

**नीरा (दै. संध्या)**

आधुनिक शेतीत यंत्रसामग्रीचा बोलबाला वाढला असला, तरी पुरंदर तालुक्याच्या दक्षिण-पूर्व भागातील शेतकरी आजही पारंपरिक बैलऔतावर विश्वास ठेवताना दिसत आहेत. ट्रॅक्टर आणि आधुनिक अवजारांच्या स्पर्धेतही ऊस बांधणीसाठी बैलजोडीची मागणी वाढत असल्याचे चित्र सध्या गुळुंचे, राख, कर्नलवाडी, रनवरेवाडी परिसरात पाहायला मिळत आहे.



“सध्या ऊस बांधणीसाठी बैलऔताला चांगली मागणी आहे. त्यामुळे मागील महिन्यात आम्ही एक लाख पंच्याहत्तर हजार रुपयांची बैलजोडी खरेदी केली. सध्या काम चांगलं मिळत असल्याने बैल सांभाळणे परवडत आहे आणि आम्हाला रोजगारही मिळतो आहे.” - राजाराम भोसले

नुकत्याच झालेल्या पावसानंतर नवीन लागवडीचा ऊस बांधणीसाठी तयार झाला असून शेतात पुन्हा एकदा बैलांच्यागळ्यातील घंटानाद घुमू लागला आहे. अनेक शेतकऱ्यांनी ऊस बांधणीसाठी छोट्या ट्रॅक्टरचा वापर सुरू केला असला, तरी काही अनुभवी शेतकरी बैलऔतच अधिक परिणामकारक असल्याचे सांगत आहेत. बैलजोडीच्या सहाय्याने प्रथम तिफणीद्वारे शेत काकरले जाते आणि त्यानंतर बांधणीच्या नांगराने उसाला माती लावली जाते. या प्रक्रियेमुळे माती अधिक भुसभुशीत होते, उसाची वाढ जोमदार होते आणि मोडतोडही कमी होते, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. ट्रॅक्टरच्या सहाय्याने ऊस बांधणीसाठी एकरी सुमारे चार हजार रुपये खर्च येतो. त्याउलट बैलऔताने हेच काम साडेतीन हजार रुपयांत होत असल्याने शेतकऱ्यांची प्रतिएकर पाचशे रुपयांची बचत होत आहे. दहा एकर ऊस असलेल्या शेतकऱ्याला जवळपास पाच हजार रुपयांचा फायदा मिळतो.

विशेष म्हणजे बैलऔताच्या कामात दोन बैल आणि दोन कामगार लागतात. त्यामुळे एका औतामागे चार जणांना रोजगार मिळतो. ट्रॅक्टरच्या तुलनेत ही पद्धत ग्रामीण रोजगारालाही हातभार लावत आहे. दोन बैलजोड्या मिळून दिवसाला सुमारे तीन एकर ऊस बांधणी करतात, तर ट्रॅक्टर चार एकर काम पूर्ण करतो. मात्र बैलऔताच्या टोळीला दिवसाला सुमारे ११ हजार रुपयांचे उत्पन्न मिळत असल्याने हा व्यवसाय पुन्हा तेजीत आला आहे.



## चाकण येथे छत्रपती संभाजी राजेंना अभिवादन

**चाकण (दै. संध्या)**

चाकण येथे छत्रपती संभाजी राजे यांना विविध सेवाभावी संस्था, संघटना व नगरपरिषद आदींच्या वतीने अभिवादन करण्यात आले. येथील नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांच्या हस्ते संभाजी राजे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी चाकण नगरपरिषदेचे शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेविका जयश्री नायकवाडी, रूपाली कांडगे, ॲड. वर्षा शेवकरी, पुनम शेवकरी, विजया तोडकर, स्वाती लेंडघर, रणजीत जरे, मंगेश कांडगे, प्रकाश भुजबळ, हर्षद लेंडघर, विकास धाडगे, सागर बनकर, आरती परदेशी, आकाश जाधव, अनिल लोहकरे, शशिकांत जाधव, विजया जाधव, शेखर पिंगळे आदी उपस्थित होते.

# नीरा नदीकाठी ११ दिवसांचा भव्य कीर्तन महोत्सव सुरू

## भागवत कथा, नवविधा भक्ती आणि कीर्तन सेवेमुळे भाविकांमध्ये उत्साह

**नीरा (दै. संध्या)**

पुणे व सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील नीरा नदीकाठावरील दत्त घाट येथे ११ दिवसांच्या भव्य कीर्तन महोत्सवाला आज उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. सकाळी मान्यवरांच्या हस्ते वीणा पूजन, ग्रंथराज ज्ञानेश्वर पूजन आणि ध्वजारोहण करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या धार्मिक सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी, वैष्णव भक्त आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

संत तुकाराम महाराजांचे वंशज शिवचैतन्य मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तर योगी निरंजननाथ यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी पूजन झाले. कलश पूजन बाळासाहेब काकडे यांच्या हस्ते, वीणा पूजन सोमेश्वरचे माजी उपाध्यक्ष लक्ष्मण गोफणे यांच्या हस्ते, तर व्यासपीठ पूजन डॉ. नितीन सावंत यांच्या हस्ते संपन्न झाले.



वारकरी संप्रदायाची परंपरा जपणाऱ्या कीर्तनकारांकडून सलग ११ दिवस कीर्तन सेवा दिली जाणार आहे. पहिल्या दोन दिवसांत दररोज दोन कीर्तने, तर उर्वरित दिवसांत प्रत्येकी एक कीर्तन असे एकूण १३ कीर्तनांचे आयोजन करण्यात आले आहे.

पडेगाव येथील भागवताचार्य दिलीप महाराज जाधव यांच्याकडून भागवत कथा वाचन होणार असून लक्ष्मण कोकाटे नवविधा भक्ती कथांचे निरूपण करणार आहेत.

या महोत्सवाला दररोज किमान पाच हजार भाविक भेट देतील, अशी माहिती आयोजकांच्या वतीने माजी जिल्हा परिषद सभापती दत्ता चव्हाण यांनी दिली. धार्मिक वातावरण, हरिनामाचा गजर आणि भागवत कथेमुळे नीरा नदी परिसर भक्तिमय झाला आहे.

यावेळी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, माजी अध्यक्ष शहाजी काकडे, शंकर मर्दाने, दत्ता फरांदे, संतोष जाधव, जालिंदर धायगुडे, सचिन महामुनी, माऊली कोरडे, जोतिबा जाधव, विजय धायगुडे, आर. के. धायगुडे, नितीन कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भारती एअरटेलची चौथ्या तिमाहीत मजबूत कामगिरी; ग्राहकसंख्या 65 कोटींच्या पार

मुंबई (दैनिक संध्या) : भारती एअरटेल लिमिटेडने मार्च 2026 अखेरच्या चौथ्या तिमाहीत मजबूत आर्थिक कामगिरी नोंदवली. कंपनीचा एकत्रित महसूल 55,383 कोटी रुपये झाला असून त्यात वार्षिक 15.7 टक्के वाढ झाली आहे. भारतातील मोबाईल व्यवसायात चांगली वाढ झाली असून एआरपीयू 257 रुपयांपर्यंत पोहोचला आहे. याशिवाय, कंपनीने या तिमाहीत 2,426 नवीन टॉवर्स आणि 16,746 मोबाईल ब्रॉडबँड बेस स्टेशन उभारले. तसेच एअरटेलने 65 कोटी ग्राहकांचा टप्पा पार करत जगातील दुसऱ्या क्रमांकाची टेलिकॉम कंपनी म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. कंपनीचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअरमन गोपाल विठ्ठल यांनी सांगितले की, आर्थिक वर्ष 2026 हे एअरटेलसाठी अत्यंत महत्त्वाचे वर्ष ठरले. कंपनीने डेटा सेंटर व्यवसायाचा विस्तार केला असून डिजिटल फायनान्स, क्लाऊड सेवा आणि एआय तंत्रज्ञान क्षेत्रातही मोठी प्रगती केली आहे. भविष्यात मजबूत डिजिटल नेटवर्क उभारणी आणि स्वच्छ ऊर्जेवर कंपनीचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारतातील मोबाईल व्यवसायात 58 लाख नवीन स्मार्टफोन ग्राहक आणि 8 लाख पोस्टपेड ग्राहकांची भर पडली आहे. होम्स, आयपीटीव्ही आणि एअरटेल व्यवसाय विभागातही चांगली वाढ झाली. भविष्यातील गुंतवणूक आणि दीर्घकालीन वाढीसाठी टॅरिफमध्ये आणखी सुधारणा होणे आवश्यक असल्याचे मतही गोपाल विठ्ठल यांनी व्यक्त केले.



### राजधानीत छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजधानीत त्यांना अभिवादन करण्यात आले. कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहाय्यक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, व्यवस्थापक प्रमोद कोलापटे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलापटे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

### हिंगोलीत साकारणार भव्य 'कामगार भवन'

मुंबई (दैनिक संध्या) : जिल्ह्यातील संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना सर्व शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी हिंगोली जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी भव्य 'कामगार भवन' उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी १४ कोटी १२ लाख ३५ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय १३ मे रोजी निर्गमित करण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार, हे भवन मौजे हिंगोली येथील सर्वे क्र. ६० आणि ६३ मधील एकूण ३३ आर (३३०० चौ.मी.) जागेवर उभारले जाणार आहे. इमारतीमध्ये पार्किंग मजल्यासह तळमजला, पहिला मजला आणि दुसऱ्या मजल्याचे नियोजन आहे. इमारतीचे एकूण बांधकाम २११४.९८ चौ.मी. आहे. या इमारतीत कामगार अधिकारी कार्यालय, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, घरेलू कामगार कल्याण मंडळ आणि माथाडी कामगार बोर्डाची कार्यालये स्थलांतरित केली जातील. इमारतीत फर्निचर, विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा प्रकल्प आणि दिव्यांगांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध असतील. सध्या हिंगोली येथील कामगार विभागाची कार्यालये खासगी भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत.

### महाराष्ट्रात 1.14 लाख कोटींची गुंतवणूक; 8,000 जणांना मिळणार रोजगार!

मुंबई (दैनिक संध्या) : राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार आज झाला. मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात (MMR) 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल. प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.



# एचडीएफसी लाइफने जाहीर केला ₹४,५९६ कोटींचा बोनस

## पार्टिसिपेटिंग पॉलिसीधारकांना मूल्यप्राप्ती करून देण्याचा विक्रम कायम

**मुंबई (दै. संध्या)**

भारतातील आघाडीच्या आयुर्विमा कंपन्यांमध्ये गणल्या जाणाऱ्या एचडीएफसी लाइफने कंपनीच्या १६ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या बोर्डाच्या बैठकीत ₹४,५९६ कोटींचा बोनस जाहीर केला. कंपनीने हा बोनस जाहीर करून पॉलिसीधारकांना दीर्घकालीन मूल्य देण्याचे आपले वचन पूर्ण केले आहे. हा एचडीएफसी लाइफने आजवर जाहीर केलेला सर्वाधिक बोनस असून, याचा लाभ २२.२ लाख पार्टिसिपेटिंग पॉलिसीधारकांना मिळणार आहे. कंपनीचा पॉलिसीधारकांना प्राधान्य देणारा



दृष्टीकोन, सातत्यपूर्ण कामगिरी व चतुर आर्थिक व्यवस्थापन यांतून अधोरेखित होते. जाहीर केलेल्या एकूण बोनसपैकी अंदाजे ₹३,७६१ कोटी रुपये आर्थिक वर्ष २७ मध्ये मॅच्युरिटी किंवा सर्वायवल पेआउटच्या स्वरूपात दिला जाणार आहे. उर्वरित बोनस पॉलिसीधारकांच्या खात्यात जमा केला जाणार असून, तो पॉलिसीच्या नियम व अटींनुसार भविष्यकाळात देय ठरेल.

HDFC Life
Sar utha ke jiyo!

एचडीएफसी लाइफच्या अपॉइंण्टेड अॅक्चुअरी व चीफ अॅक्चुअरी ईश्वरी मुरुगम या घोषणेबद्दल म्हणाल्या: "आमच्या वार्षिक बोनसची घोषणा म्हणजे पॉलिसीधारकांसाठी दरवर्षी स्थिर दीर्घकालीन मूल्यनिर्मिती करण्याच्या आमच्या वचनाची पूर्तता आहे. पॉलिसीधारकांनी आमच्यावर टाकलेल्या विश्वासामुळे आम्हाला बाजारांतील सर्व चढउतारांमध्ये सातत्याने खात्रीशीर निष्पत्ती देण्यासाठी प्रेरित करतो. चतुर वित्तीय व्यवस्थापन, ग्राहककेंद्री नवोन्मेष आणि आम्ही सेवा देत असलेल्या प्रत्येक भारतीय कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेची खात्री यांवर लक्ष केंद्रित करून आम्ही काम करतो. '२०४७ सालापर्यंत सर्वांसाठी विमा' या उद्योगक्षेत्राच्या व्यापक उद्दिष्टाशी सुसंगती राखण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." एचडीएफसी लाइफचे शिस्तबद्ध गुंतवणूक धोरण, भक्कम जोखीम व्यवस्थापन आणि शाश्वत वाढीवर दिला जाणारा भर या बोनसच्या घोषणेतून दिसून येतो. त्यामुळे पॉलिसीधारकांना स्थिर व अपेक्षित बोनस खात्रीने मिळतो. गतीशील स्थूलआर्थिक वातावरणात आर्थिक लवचिकता टिकवून ठेवतानाच पॉलिसीधारकांसाठी स्थिर मोबदला निर्माण करण्याची कंपनीची क्षमताही यातून अधोरेखित होते. वार्षिक बोनस पार्टिसिपेटिंग धोरणांसाठी जाहीर केला जातो आणि कंपनीच्या आर्थिक ताकदीचा व कार्यात्मक स्थैर्याचा तो महत्त्वाचा निदर्शक आहे. विविध पोर्टफोलिओंमध्ये गुंतवणुकीचे विभाजन करून तसेच ग्राहककेंद्री दृष्टीकोन ठेवून एचडीएफसी लाइफ गेल्या अनेक वर्षांपासून उत्तम बोनस जाहीर करत आली आहे.

## महसूल विभागांतर्गत आता केवळ संख्यात्मक नव्हे तर दर्जात्मक सेवांवर भर; -महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (दै. संध्या)**

महसूल विभाग सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडीत सेवा देणारा विभाग असून अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्तांची समिती नेमण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रत्येक महिन्यात एक अभियान राबविण्याचे फ्रेमवर्क तयार करण्यात येईल आणि केवळ संख्यात्मक नव्हे तर दर्जात्मक सेवांवर भर देण्यात येईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाबाबत राज्यस्तरीय समितीची बैठक महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. सदस्य आमदार प्रसाद लाड, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, अपर मुख्य सचिव विकास खारगे



आदी यावेळी उपस्थित होते. समितीचे अन्य सदस्य आमदार ऑनलाईन सहभागी झाले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, राज्यातील सामान्य नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना महसूल विभागाच्या सेवा गतीने मिळाव्यात यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियाना'च्या माध्यमातून नागरिकांना विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या आहेत. या अभियानामुळे महसूल विभागाबद्दल जनतेत विश्वासार्हता निर्माण झाली आहे. आगामी काळात विधान परिषद सदस्यांच्या समन्वयाने हे अभियान अधिक व्यापक केले जाईल. आमदार विक्रांत पाटील यांची 'राज्यस्तरीय समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ते लोकसहभाग वाढवण्यासाठी ते काम पाहतील. प्रत्येक जिल्ह्यासाठी विधान परिषद सदस्यांना जबाबदारी देऊन कामावर लक्ष ठेवले जाईल.

## उरण शहरात लवकरच सुरु होणार पोस्ट कार्यालय; नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

**उरण (दै. संध्या)**

गेली अनेक महिने उरणच्या नागरिकांना पोस्ट कार्यालयाच्या व्यवहारासाठी जेएनपीटी टाऊनशिप येथे जावे लागत होते. पूर्वी उरण शहरात असलेले पोस्ट कार्यालय जेएनपीटी टाऊनशिप येथे हलविल्याने जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्त्रिया आदी व्यक्तींना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. मात्र हे जेएनपीटी टाऊनशिपला असलेले कार्यालय पुन्हा पूर्वी प्रमाणे उरण शहरात कार्यरत होणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

उरण शहरातील आनंदनगर येथील जुन्या पोस्ट कार्यालयाची इमारत पुनर्विकासासाठी गेल्यानंतर हे कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात जेएनपीटी शॉपिंग सेंटर येथे हलविण्यात आले होते. मात्र, शहरापासून दूर गेलेल्या या कार्यालयामुळे नागरिकांना अतिरिक्त प्रवास खर्च, वेळेचा अपव्यय आणि अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

यामुळे पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. अखेर या मागणीला यश आले असून, लवकरच उरण शहरात नव्या ठिकाणी पोस्ट कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. कामठा रस्त्यावरील शामियाना हॉटेलसमोरील युनियन बँकेच्या वरच्या मजल्यावर हे पोस्ट कार्यालय सुरू होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन, बचत खाते, मनीऑर्डर, पोस्टल व्यवहार तसेच विविध शासकीय कामांसाठी वारंवार पोस्ट कार्यालयात जावे लागते. महिला वर्गालाही दैनंदिन व्यवहारांसाठी मोठी गैरसोय होत होती.

आता पोस्ट कार्यालय पुन्हा शहरात सुरू होत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.उरण शहरात पोस्ट कार्यालय सुरु होणार असल्यामुळे नागरिकांच्या वेळ व पैशाची, श्रमाची बचत होणार असल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत लवकरात लवकर उरण शहरात पोस्ट कार्यालय सुरु करावे अशी मागणी केली आहे.

## धरणांतील गाळ उपसून शेतकऱ्यांना मोफत देणार; सहा मोठ्या प्रकल्पांवर प्रायोगिक अंमलबजावणी

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील धरणांमध्ये वाढत चाललेला गाळ, कमी होत चाललेली पाणी साठवण क्षमता आणि अनियंत्रित वाळू उपसा या गंभीर समस्यांवर उपाय म्हणून मंत्रिमंडळ बैठकीत सहा प्रमुख सिंचन प्रकल्पांच्या जलाशयातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यास मंजुरी देण्यात आली. यासोबतच गाळ उपशासाठीचे सुधारित धोरणही मंजूर करण्यात आले.

यामुळे धरणांची पाणी साठवण क्षमता वाढणार असून, सिंचन कार्यक्षमता सुधारणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात उजनी, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी आणि हतनूर या



सहा धरणांचा समावेश करण्यात आला आहे. धरणांतून काढलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत दिला जाणार आहे. शेतकऱ्यांना फक्त वाहतूक खर्च करावा लागणार असून, त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे. यामुळे शेतीची उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

महसूल सिंचन प्रकल्पांच्या दुरुस्तीसाठी गाळ उपशाची जबाबदारी संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांची असेल. यातून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना, दुरुस्ती आणि देखभाल कामांसाठी वापरण्यात येणार आहे.

वाळू उपशातील गैरप्रकार आणि चोरी रोखण्यासाठी सरकारने कठोर तांत्रिक यंत्रणा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. गाळमिश्रित वाळूपासून वेगळी करण्यात आलेली वाळू जीओ-फेन्सिंग क्षेत्रात साठवली जाणार आहे. तेथे 24 तास सीसीटीव्ही असेल. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे, ई-पास, बारकोड प्रणाली आणि ऑनलाईन नोंदी ठेवणे बंधनकारक आहे. केवळ वाळू उपसा करण्यास परवानगी दिली जाणार नाही. गाळ आणि वाळू दोन्ही काढणे कंत्राटदारासाठी अनिवार्य असेल. तसेच, नैसर्गिक जमिनीच्या पातळीखाली दोन फुटांपेक्षा अधिक उत्खननास मनाई करण्यात आली आहे.

पर्यावरण विभागाची परवानगी, राज्य तज्ज्ञ मूल्यमापन समिती आणि राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक राहणार आहे. तसेच, केंद्र सरकारच्या शाश्वत वाळू खाणकाम व्यवस्थापन मार्गदर्शक तत्त्वे 2016 आणि वाळू खाणकामासाठी अंमलबजावणी व देखरेख मार्गदर्शक तत्त्वे 2020 मधील सर्व निकषांचे पालन बंधनकारक असेल.

## भारत-श्रीलंका आर्थिक सहकार्याला नवी चालना

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई येथील एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीलंकेतील सिलोन चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळासोबत परस्पर संवाद बैठक पार पडली. उद्योजक, निर्यातदार, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग प्रतिनिधी आणि व्यावसायिकांनी या बैठकीत सहभाग घेतला.

मुंबई येथील श्रीलंकेच्या वाणिज्य दूतावासाच्या महावाणिज्यदूत प्रियांगा विक्रमसिंघे यांनी श्रीलंकेतील उद्योगक्षेत्र हे भारतीय उद्योगांबरोबर भागीदारी वाढविण्यास उत्सुक असल्याचे सांगितले. लॉजिस्टिक्स, पर्यटन, अक्षय ऊर्जा, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी श्रीलंकेतील १७ प्रमुख उद्योग समूहांचे प्रतिनिधी या शिष्टमंडळात सहभागी झाल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. ऑक्टोबर २०२६ मध्ये होणाऱ्या श्रीलंका आर्थिक आणि गुंतवणूक परिषदेत भारतीय उद्योगांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहनही विक्रमसिंघे यांनी केले.

सिलोन चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष तथा जॉन कील्स होल्डिंग्स पीएलसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्ण बालेंद्र यांनी भारताच्या नजीकच्या भौगोलिक स्थानामुळे श्रीलंका हा प्रादेशिक व्यापार, लॉजिस्टिक्स, पर्यटन आणि पुरवठा साखळी क्षेत्रातील नैसर्गिक भागीदार असल्याचे सांगितले. बैठकीनंतर भारतीय आणि श्रीलंकन उद्योग प्रतिनिधींमध्ये सविस्तर चर्चा आणि नेटवर्किंग सत्र पार पडले.

# भारताच्या संरक्षणासाठी मुंबईत १७ मे रोजी 'श्री राजमातंगी महायज्ञ'

**मुंबई (दै. संध्या)**

जगावर सध्या तिसऱ्या महायुद्धाचे काळे ढग दाटले असताना, केवळ राजकीय किंवा बौद्धिक स्तरावरील प्रयत्न पुरेसे नसून राष्ट्राला आध्यात्मिक अधिष्ठानाची मोठी गरज आहे. याच उदात्त हेतूने, भारताला अभेद्य आध्यात्मिक संरक्षककवच लाभावे आणि देशाची सर्वांगीण प्रगती होऊन पुन्हा एकदा 'रामराज्या'चा उदय व्हावा, या संकल्पपूर्तीसाठी सनातन संस्थेच्या वतीने मुंबईत 'श्री राजमातंगी महायज्ञा'चे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी, १७ मे २०२६ रोजी प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिराच्या पाठीमागे असलेल्या नर्दुल्ला टँक मैदानावर दुपारी ३.३० ते सायं. ७.३० या वेळेत हा यज्ञ सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न होणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक यांनी मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या वेळी संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ता श्री. चेतन राजहंस, पुरोहित अन् ज्योतिर्विद श्री. श्रेयस पिसोळकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे नवी मुंबई समन्वयक श्री. कैलास पाटील उपस्थित होते. हा महायज्ञ केवळ धार्मिक विधी नसून तो राष्ट्ररक्षणाचा एक आध्यात्मिक लढा असल्याचे या वेळी अधोरेखित करण्यात आले.

या यज्ञाचे आध्यात्मिक महत्त्व विशद करताना श्री. अभय वर्तक म्हणाले की, आदिशक्ती देवी सतीच्या क्रोधातून प्रकट झालेल्या 'दशमहाविद्यां'मध्ये मातंगीदेवीचे स्थान अनन्यसाधारण आहे. देवी मातंगी ही आदिशक्तीची 'प्रधानमंत्री' म्हणजेच प्रमुख सल्लागार मानली जाते. शत्रूवर विजय मिळवण्यासाठी आणि प्रतिकूल परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी या देवीची उपासना फलदायी ठरते. ऐतिहासिक संदर्भांचा दाखला देत त्यांनी सांगितले की, त्रेतायुगात प्रभू श्रीरामाच्या अवताराच्या वेळीही




राजमातंगी देवीचे तत्त्व कार्यरत होते, ज्यामुळे आदर्श रामराज्य स्थापन होऊ शकले. आजच्या काळातही तशाच दैवी शक्तीच्या आशीर्वादाने भारताचे संरक्षण व्हावे, हा या यज्ञामागील मुख्य उद्देश आहे.

या महायज्ञाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे १ हजार वर्षांपूर्वी आक्रमक महंमद गझनीने भग्न केलेल्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या दिव्य अंशांचे दर्शन ! इतिहासाची साक्ष देणारे हे पवित्र अवशेष याठिकाणी दर्शनासाठी ठेवले जाणार असून भाविकांसाठी ही एक दुर्मिळ संधी असणार आहे असे श्री. चेतन राजहंस म्हणाले. यज्ञाची सुरुवात महासंकल्प, श्री गणेश आवाहन आणि पुण्याहवाचन होणार असून, श्री राजमातंगी देवीच्या मूलमंत्रांनी यज्ञामध्ये आहुती अर्पण केल्या जातील. यज्ञाचे पौरोहित्य इरोड, तामिळनाडू येथील शिवागम विद्यानिधी आगमाचार्य श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती करतील तर शिवाचार्य श्री. गुरुमूर्ती हे यज्ञाचे मुख्य आचार्य असतील, असे पुरोहित अन् ज्योतिर्विद श्री. श्रेयस पिसोळकर म्हणाले.

या यज्ञाला मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हयातील अनेक मंदिरांचे विश्वस्त आणि पुजारी सहभागी होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे नवी मुंबई समन्वयक श्री. कैलास पाटील यांनी दिली.

सनातन संस्थेने आतापर्यंत ७५० हून अधिक यज्ञ-अनुष्ठाने केली आहेत. या यज्ञ सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, संत-महंत, राज्य सरकारमधील मंत्री, हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी, विचारवंत, वकील आणि उद्योजकांसह सुमारे ५ हजार भाविक उपस्थित राहतील. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी ज्या मुंबापुरीतून धर्मकार्याचा श्रीगणेशा केला, त्याच नगरीत होणारा हा महायज्ञ राष्ट्रउभारणीच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. सर्व धर्मप्रेमी हिंदूंनी सहकुटुंब या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. अभय वर्तक यांनी केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाळूंग–पंढरपूर 29 किमी मार्गाचा पालखी मार्गात समावेश करण्याची थिटे यांची मागणी

पुणे (दैनिक संध्या) : केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे पंढरपूर येथे स्वागत करून नगरसेवक सौरभ थिटे (पाटील) यांनी महाळूंग ते पंढरपूर या २९ किलोमीटर मार्गाचा जगतगुरु संत तुकाराम महाराज पालखी मार्गात समावेश करून त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याची मागणी केली. अकलूज ते पंढरपूर व्हाया महाळूंग, पिराची कुरोली, शेळवे या मार्गाचा संत तुकाराम महाराज पालखी मार्गात समावेश व्हावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. सध्या संत तुकाराम महाराजांचा पालखी मार्ग अकलूज, महाळूंग ते तोंडले-बोंडले असा असून, पूर्वी पालखी सोहळा जुन्या अकलूज रस्त्याने वाखरी गावात येत होता. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात संत तुकाराम महाराज चतुःशताब्दी निमित्त केंद्र सरकारच्या निधीतून हा जुना अकलूज मार्ग विकसित करण्यात आला होता. तसेच संत एकनाथ महाराजांचा पालखी सोहळा कौठाळी, शिरढोण मार्गे इसबावी विसावा येथे येतो, तर संत निवृत्तीनाथ महाराजांचा पालखी सोहळा नवीन सोलापूर पुलावरून जुन्या अकलूज मार्गाने वाखरी येथे पोहोचतो.आषाढी दशमीला सर्व पालखी सोहळे वाखरीहून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. वारी काळात सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याने हा पर्यायी मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. लाखो वारकरी, दिंड्या, एसटी बस आणि इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असल्याने आपत्कालीन मदत पोहोचविण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे महाळूंग–पंढरपूर मार्गाचा पालखी मार्गात समावेश झाल्यास वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होईल, असा दावा करण्यात आला. मुंबई, पुणे आणि बारामतीकडे जाण्यासाठी हा महत्त्वाचा पर्यायी मार्ग असल्याने त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. या मागणीसाठी वाखरी, शिरढोण, कौठाळी, शेळवे, पिराची कुरोली, खेड भाळवणी आणि कुरोली ग्रामपंचायतींनी ठराव मंजूर करून पाठिंबा दिला असून त्या ठरावांच्या प्रती निवेदनासोबत जोडण्यात आल्या. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार समाधान आवताडे,योगी निरंजननाथजी तसेच मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज आदी उपस्थित होते.



### चाकण येथे रविवारी मतदार जनजागृती शिबिर

चाकण (दैनिक संध्या) : स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान, शिवसेना खेड तालुका व नगरसेवक तसेच माणिक चौकातील आझाद हिंद मंडळाचे अध्यक्ष शशिकांत जाधव मित्र परिवार व चाकण नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे रविवारी (दि.१७) मतदार जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले आहे. एसआयआर तथा विशेष गहन पुनरावृत्ती अंतर्गत येथील प्रभाग क्रमांक ११ मध्ये रविवारी माणिक चौकातील अंगणवाडीत सकाळी ११ ते सायंकाळी पाच या दरम्यान या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांच्या हस्ते आणि गटनेते नितीन गोरे यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या शिबिराची जोरदार तयारी करण्यात आली असल्याची माहिती स्मिता जाधव, वृषाली देशमुख, शशिकांत जाधव, योगेश देशमुख यांनी दिली. अधिक माहितीसाठी सोपान टोपे, गणेश होले, राजेंद्र वाघमारे व खुनमीर बालगुडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन स्मिता जाधव यांनी केले आहे.

### हरिपाठ उद्यानाजवळ भीषण अपघात; टँकरखाली सापडून महिलेचा दुर्दैवी मृत्यू

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी येथील चऱ्होली रोड, हरिपाठ बाल उद्यान गणपती मंदिर परिसरात गुरुवारी सायंकाळी भीषण अपघात घडून एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. मोटारसायकलचा तोल जाऊन महिला रस्त्यावर पडल्याने समोरून येणारा पाण्याचा टँकर त्यांच्या डोक्यावरून गेल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात आन्नपूर्ण माणिकराव रोकडे (वय ६३, रा. विकासवाडी, धनोरे फाटा, आळंदी, ता. खेड, जि. पुणे) यांचा मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवारी (दि.१४ मे) रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास गणपती मंदिर चौक, हरिपाठ उद्यानाजवळ घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकलचा अचानक तोल गेल्याने संबंधित महिला खाली पडल्या. त्याचवेळी समोरून येणाऱ्या पाण्याच्या टँकरखाली त्या आल्याने हा गंभीर अपघात झाला.

# सासवडमध्ये २२ मे पासून 'पुरंदर कृषी एक्स्पो'

## आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतकरी सन्मान

सासवड (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनाला नवी दिशा देण्यासाठी 'शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठान'च्या वतीने २२ ते २५ मे २०२६ या कालावधीत भव्य 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर हे प्रदर्शन सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सर्वांसाठी खुले राहील., कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे., अशी माहिती माजी आमदार संजय जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दिवंगत चंदुकाका जगताप यांच्या प्रेरणेतून साकारलेल्या या प्रदर्शनात १६० व्यावसायिक स्टॉल्ससह महिला बचत गटांसाठी ५० विशेष स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे आधुनिक 'ड्रोन तंत्रज्ञान' आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' चा शेतीतील वापर असणार आहे. तसेच, उच्च जातीच्या पशुधनाचे भव्य पशुप्रदर्शन, शेती उपयोगी अवजारे आणि ट्रॅक्टर्सची स्वतंत्र दालने येथे पाहायला मिळतील.



शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी दररोज तज्ज्ञांच्या व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, डॉ. सोमनाथ माने, डॉ. विवेक भोईटे यांसारखे दिग्गज पशु आहार, ऊस शेती आणि फळबाग व्यवस्थापनावर मार्गदर्शन करतील. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांनाही संधी देण्यात आली आहे. प्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यासाठी 'झुणका-भाकर' भोजनाची मोफत सोय असून, दररोज लकी ड्रॉद्वारे १०० शेती उपयोगी अवजारे वाटली जाणार आहेत. प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी एका भाग्यवान शेतकऱ्याला 'फळबागेसाठी उपयुक्त ट्रॅक्टर' बंपर बक्षीस म्हणून दिला जाईल. या प्रदर्शनासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक आणि संत सोपानकाका बँक यांनी सहकार्य केले आहे. या पत्रकार परिषदेला सेवानिवृत्त कृषी अधिकारी संभाजी गरूड, पुरंदर मिल्कचे संचालक विलास जगताप, संत सोपानकाका बँकेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश पवार आणि रवींद्रपंत जगताप उपस्थित होते. तालुक्यातील व जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## जेजुरीच्या श्री स्वामी समर्थ मठात सुगंधी दवणा महोत्सव साजरा



जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या श्री स्वामी समर्थ मठात सुगंधी दवणा महोत्सव साजरा करण्यात आला. जेजुरी येथील ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असणाऱ्या श्री स्वामी समर्थ मठात गुरुवारचे औचित्य सुगंधी दवणा वनस्पतीची आरास करून दवणा महोत्सव साजरा करण्यात आला.

श्री स्वामीमय सेवा ट्रस्टचे अध्यक्ष गणेश मोरे, उपाध्यक्ष माऊली खोमणे व स्वामी भक्तांच्या वतीने हा महोत्सव साजरा करण्यात आला.

## महाराजस्व अभियानात विविध शासकीय योजनेतील दाखले व कार्डचे वाटप

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्या वतीने जेजुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान घेण्यात आले. यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय दाखले, कार्डचे वाटप करण्यात आले. जेजुरी येथील मल्हार नाट्यगृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाचे उद्घाटन जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी तहसीलदार विक्रम राजपूत, नायब तहसीलदार संदीप पाटील, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, नगरसेवक अस्लम पानसरे, शिवाजी जगताप,योगेश जगताप, स्वप्नील हरपळे , रोहित खोमणे, नगरसेविका आमिना पानसरे,मंदा बयास, भक्ती कोरपड, मोनिका घाडगे, नीलम सातभाई, प्रज्ञा राऊत, स्वरुपा खोमणे, मंडल अधिकारी संजय बडदे, सुहास कांबळे, तसेच शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते. शासनाची ही महत्वकांक्षी योजना असून शासनाच्या प्रत्येक विभागाच्या योजनांचा लाभ नागरिकांना मिळणार आहे. पुरंदर तालुक्यातील सासवड, शिवरी, परिंचे, वाघापूर व नारायणपुर येथे हे अभियान राबविण्यात आले असून हजारो शेतकरी व नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. जमीन वहिवाट, भूमिहीन नागरिकांना निवासी दाखले, जिवंत सातबारा, संजय गांधी, इंदिरा गांधी निराधार योजना, लाडकी बहिण, पी एम किसान योजना, रेशनकार्ड, घरकुल योजना, तातडीची मोजणी, पाणंद रस्ते मोजणी, कृषी, पशू, आरोग्य, वीज, परिवहन, आदी विभागांच्या योजना व त्याचे लाभ लाभार्थींना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची असून या अभियानाचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन तहसीलदार विक्रम राजपूत यांनी यावेळी केले.

जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

योजनांची माहिती नसल्याने व कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याने नागरिकांना शासन दरबारी हेलपाटे मारावे लागत होते. या शासकीय समाधान अभियानामुळे शासन आपल्या दारी येवून सर्वसामान्य जनतेला लाभ मिळत आहे असे सांगितले. या शिबिरात शासनाच्या सर्व विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते, विविध दाखले व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.


# पुणे-सोलापूर महामार्गाच्या उन्नत मार्गाच्या कामाआधी 'वाढीव लेन' करा

## जिल्हा नियोजन बैठकीत आमदार राहुल कुल यांची आग्रही मागणी

यवत (दै. संध्या)

पुणे-सोलापूर आणि पुणे-नगर महामार्गावर मंजूर झालेल्या उन्नत मार्गाचे (Flyover) काम प्रत्यक्ष सुरू करण्यापूर्वी, वाहतुकीची होणारी कोंडी टाळण्यासाठी रस्त्याच्या बाजूला तातडीने 'वाढीव लेन' तयार करण्यात याव्यात, अशी आग्रही आणि महत्त्वाची मागणी आमदार राहुल कुल यांनी केली.

पुणे जिल्हा नियोजन समितीची महत्त्वाची बैठक राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. नामदार श्रीम. सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाली. या बैठकीत आमदार राहुल कुल यांनी दौंड मतदारसंघासह संपूर्ण पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील



पायाभूत सुविधा, शेती, क्रीडा आणि दळणवळणाच्या प्रश्नांवर प्रशासनाला धारेवर धरत विविध मागण्यांचा धडाका लावला. या बैठकीत जिल्ह्याच्या अंतिम विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली.

बैठकीत बोलताना आमदार राहुल कुल यांनी महामार्गांवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न अत्यंत गंभीरतेने मांडला. "पुणे-सोलापूर आणि पुणे-नगर महामार्गावर उन्नत मार्गाचे काम सुरू झाल्यावर वाहतुकीचा बोजवारा उडू नये, यासाठी प्रशासनाने आधीच नियोजन करून अतिरिक्त लेन तयार कराव्यात," अशी मागणी त्यांनी केली. तसेच ग्रामीण भागाचा कणा असलेल्या ग्रामपंचायत इमारती, स्मशानभूमी, गावांतर्गत रस्ते आणि सामाजिक सभागृहांची प्रलंबित कामे प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तातडीने मार्गी लावावीत, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

ग्रामीण भागातील दिव्यांग बांधवांसाठीचे अपंग साहित्य वाटप आणि खेळाडूंसाठीच्या क्रीडा साहित्याची खरेदी ही 'इ-निविदा' (e-Tender) प्रणालीच्या माध्यमातूनच झाली पाहिजे, जेणेकरून कामात पारदर्शकता राहील आणि दर्जेदार साहित्य वेळेत मिळेल, अशी भूमिका आमदार कुल यांनी मांडली. तसेच मंजूर झालेली सर्व विकासकामे ठरलेल्या वेळेत आणि दर्जेदार पद्धतीनेच पूर्ण झाली पाहिजेत, यात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

पुणे जिल्ह्याला ऐतिहासिक वैभव लाभले असून, जिल्ह्याचा अद्ययावत पर्यटन आराखडा तयार करून 'किल्ले संवर्धन विशेष मोहीम' राबवावी, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच शेतकऱ्यांसाठी आणि ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी इलेक्ट्रिक पंप मंजूर करावेत, तसेच पर्यावरण रक्षणासाठी प्रस्तावित रिंग रोड, गडकिल्ले आणि अष्टविनायक महामार्गाच्या दुतर्फा व्यापक वृक्षारोपण मोहीम राबवावी, अशा विविध विषयांवर त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

या बैठकीस जिल्ह्यातील सर्व मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, जिल्हाधिकारी आणि जिल्हा प्रशासनातील सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. आमदार कुल यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर पालकमंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

### आमदार राहुल कुल यांनी केलेल्या मागण्या

- पुणे जिल्ह्याचा अद्ययावत पर्यटन आराखडा तयार करा
- पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या 'डीपीडीसी' बैठकीत दौंडसह ग्रामीण पुण्याच्या प्रश्नांचा धडाका.
- ग्रामपंचायत इमारती, स्मशानभूमी, अंतर्गत रस्ते आणि सामाजिक सभागृहांची कामे तातडीने मार्गी लावण्याची देखील मागणी

# प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्याचा निर्धार करूया - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकाचवेळी जिल्ह्यातील ४५ मॉडेल प्राथमिक केंद्राचे लोकार्पण

बारामती (दै. संध्या)

नागरिकांचे आरोग्य चांगले राहिले तर देशाचे भविष्य उज्ज्वल राहील; यादृष्टीने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लोकाभिमुख आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाला नेहमीच बळ दिले आहे, त्यामुळे प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्याचा निर्धार करून आरोग्यदायी, सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

जिल्हा परिषदेच्यावतीने बारामती तालुक्यातील होळ येथे उभारण्यात आलेल्या मॉडेल प्राथमिक केंद्राचे लोकार्पण करण्यात आले तसेच यावेळी जिल्ह्यातील ४४ मॉडेल प्राथमिक केंद्राच्या दुरदृष्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, राज्याचे दिवंगत अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्हा परिषदेने साकारलेल्या विविध लोकोपयोगी आणि नाविन्यपूर्ण योजना आज संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'नासा-इस्रो भेट योजना', 'एकलमाता कल्याण योजना' सारख्या महत्त्वपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या अनेक योजनांची नोंद इतर राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांनी घेतली आहे, त्या संस्था आज आपल्या जिल्हा परिषदेशी संपर्क साधत आहेत, हे आपल्या कामाचे यश आहे.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे जिल्हा परिषदेने आज एकाच वेळी, एकाच दिवशी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हस्ते ४४ मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्राचे अत्यंत साध्यापद्धतीने दूरदृष्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्याचे नियोजन केले, त्यामुळे अनावश्यक खर्चाला आळा बसला आहे, ही बाब स्तुत्य असून अनुकरणीय आहे.

विविध कंपन्यांच्या 'सीएसआर'च्या माध्यमातून 'सर्व्हायकल कॅन्सर फ्री बारामती फॉर मदर्स अँड डॉटर्स' या उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला असून ही केवळ आरोग्य मोहिम नसून माता-भगिनींच्या सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठीचा व्यापक पाया आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून बारामती तालुक्यातल्या ३० ते ६५ वयोगटातील प्रत्येक महिलांची मोफत एचपीव्ही डीएनए तपासणी आणि ९ ते १४ वयोगटातील मुलींना एचपीव्ही लसीकरण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या माध्यमातून तालुक्यातील प्रत्येक आई आणि मुलीला कॅन्सर विरोधी संरक्षण कवच देण्याचे ध्येय ठेवले आहे. आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासनाच्या समन्वयातून हा उपक्रम गावागावात राबविला जाणार आहे. बारामतीला 'गर्भाशय मुखाचा कर्करोग मुक्त तालुका' करण्याचा निर्धार आहे.

प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी असून याच विचारातून "मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र" ही संकल्पना पुढे आली आहे. पुणे जिल्हा हा आरोग्य सुविधांच्यादृष्टीने राज्यामध्ये नेहमीच आघाडीवर राहिला आहे. ग्रामीण आणि शहरी भागात व्यापक आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कार्यरत आहे. मात्र बदलत्या काळानुसार ग्रामीण आरोग्य व्यवस्थाही आधुनिक आणि सक्षम होणे आवश्यक होते. त्यासाठीच 'मॉडेल पीएचसी' ही संकल्पना पुढे आली.

मॉडेल पीएचसीचे केंद्र हे आधुनिक सुविधा, प्रशिक्षित डॉक्टर, कुशल कर्मचारी, मातृत्व व बाल आरोग्य सेवा, रोग प्रतिबंध, जनजागृती आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर असलेले सर्वसमावेशक आरोग्य केंद्र आहे. या केंद्रामध्ये मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, डिजिटल हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम, सुसज्ज प्रसूती गृह, स्वच्छ आणि रुग्णाभिमुख वातावरण यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण नागरिकांना शहरासमान दर्जाची आरोग्य सेवा आता आपल्या गावातच मिळणार आहे. आज पुणे जिल्ह्यात ११० पैकी ५५ प्राथमिक आरोग्य केंद्रे मॉडेल पीएचसी प्रक्रियेत आहेत. त्यापैकी १९ केंद्रांचे अत्याधुनिक नूतनीकरण पूर्ण झाले असून ती पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. ७ केंद्रांची कामे प्रगतीपथावर असून लवकरच ती पूर्ण होतील. २९ केंद्रांमध्ये प्रसूतीगृह आणि शस्त्रक्रिया विभागांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. या कामामध्ये 'सीएसआर'च्या माध्यमातून अनेक संस्थांनी मोलाचे योगदान दिलं आहे. 'बॉश इंडिया'ने आठ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी निधी उपलब्ध करून देत मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, प्रसूती गृह आणि अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून दिली आहे. भारत फोर्ज उद्योगसमूहाने होळ मॉडेल 'पीएचसी'साठी दोन कोटी रुपयांचा निधी दिला आहे.